रायगड, नवी मुंबई
वर्ष १६ ◆ अंक १७२
www.ramprahar.com
# राम प्रहर
सोमवार, ८ जानेवारी २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग

मनोज जरांगे-पाटील यांची कुणबी नोंद सापडली/२
नवी मुंबईकरांना मिळणार विविध नागरी प्रकल्प/६
अफगाणिस्तानविरुद्ध टी-२० मालिकेसाठी रोहित कर्णधार/८

### पंतप्रधान मोदींवर टीका : मालदीवमधील तीन मंत्री निलंबित



**माले** : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काही दिवसांपूर्वी लक्षद्वीपचा दौरा करून काही फोटो त्यांच्या सोशल मीडिया अकाउंट्सवर शेअर केले होते. त्यावर मालदीवमधील नव्या सरकारमधील काही नेत्यांनी वादग्रस्त टिप्पणी केली. भारत सरकारने हा मुद्दा मोहम्मद मुइज्जू सरकारसमोर उपस्थित केला. मालदीवमधील भारताच्या उच्चायुक्तांनीदेखील यावर तीव्र नाराजी व्यक्त केली. त्यानंतर मालदीवच्या मंत्री मरियम शिउना, मालशा शरीफ आणि महजूम माजिद यांना त्यांच्या सरकारने निलंबित केले आहे. याबाबत मालदीव सरकारने अधिकृत निवेदन जारी करून म्हटले आहे की, आमच्या मंत्र्यांनी केलेली व्यक्तव्ये ही त्यांची वैयक्तिक आहेत. मालदीव सरकारचा त्याच्याशी संबंध नाही. दरम्यान, भारतीयांनी मालदीव टूर रद्द करून पंतप्रधान मोदींना पाठिंबा दर्शविला आहे.

# लोकनेते रामशेठ ठाकूर यांना जीवन गौरव पुरस्कार प्रदान

## मान्यवरांची लाभली सोहळ्यास उपस्थिती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

**दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर पत्रकार संघाच्या वतीने पत्रकार दिनानिमित्त सामाजिक, शैक्षणिक, राजकीय, वैद्यकीय, सांस्कृतिक अशा विविध क्षेत्रांत अविरतपणे उल्लेखनीय कार्य करणारे आणि सर्व समाजाला प्रेरणादायी असलेले माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांना रविवारी (दि. ७) दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.**




(छाया : विकास म्हात्रे) अधिक छायाचित्रे पान ८ वर..

आंतरराष्ट्रीय एक्सलन्स अवॉर्ड पुरस्कार सोहळ्याचे आयोजन पनवेलमधील आद्यक्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात करण्यात आले होते. या वेळी पत्रकारिता तसेच इतर क्षेत्रांत आपल्या कार्याचा ठसा उमटविणाऱ्या कर्तृत्ववान व्यक्तींचा सन्मान करण्यात आला. या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांना खासदार श्रीरंग बारणे यांच्या हस्ते दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर जीवन गौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला.

या सोहळ्यास प्रमुख पाहुणे म्हणून झी २४ तास न्यूज चॅनलचे संपादक निलेश खरे, दै. महाराष्ट्र जनमुद्राचे संपादक डॉ. दीपक दळवी, भारतीय पत्रकार संघाचे अध्यक्ष सुनील सोनवणे, पेण एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष अ‍ॅड. मंगेश नेने, अलबत्या गलबत्या नाटकातील चिंची चेटकिणीची मध्यवर्ती भूमिका साकारणारे अभिनेते निलेश गोपनारायण, मिसेस इंडिया इंटरनॅशनल दुबई येथील विजेत्या डॉ. शुभदा जगदाळे यांची विशेष उपस्थिती होती. **(पान २ वर..)**

### लोकनेते रामशेठ ठाकूर यांची स्वकर्तृत्वावर भरारी –खासदार बारणे

खासदार श्रीरंग बारणे यांनी आपल्या मनोगतात माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी स्वकर्तृत्वावर इतकी मोठी भरारी घेतली असून शिक्षण संस्था उभ्या करून अनेकांना आयुष्यात मोठे करण्याचे काम ते करीत असल्याचे नमूद केले. आज माझ्या हस्ते त्यांना जीवनगौरव पुरस्कार प्रदान करण्यात येत असल्याने मी स्वतःला भाग्यवान समजतो, असेही त्यांनी या वेळी आवर्जून सांगितले.

**“सार्वजनिक जीवनात वावरताना जमेल तितके काम मी करीत असतो. मराठी पत्रकारितेचे जनक आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या नावाने मला जीवन गौरव पुरस्कार मिळत असल्याने अतिशय आनंद आहे. आज माझ्यावरील प्रेमाखातर आपण एवढ्या मोठ्या संख्येने इथं उपस्थित राहिलात त्याबद्दल तुमचे आभार!**
**–लोकनेते रामशेठ ठाकूर, माजी खासदार**

# अटल सेतू लोकार्पण सोहळ्याच्या पूर्वतयारीचा मुख्यमंत्र्यांकडून आढावा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

अटलबिहारी वाजपेयी शिवडी–न्हावा शेवा अटल सेतूचे १२ जानेवारी रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते लोकार्पण होणार आहे. मुख्य कार्यक्रम नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ येथे होणार असून या कार्यक्रमाच्या पूर्वतयारीचा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी रविवारी (दि. ७) आढावा घेतला. कार्यक्रमाचे दिमाखदार आणि काटेकोरपणे नियोजन करण्याच्या सूचना त्यांनी या वेळी दिल्या.



मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली पूर्वतयारी आढावा बैठक नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ येथे आयोजित करण्यात आली होती. त्या वेळी ते बोलत होते. या बैठकीस आमदार महेश बालदी, मुंबई मनपाचे आयुक्त तथा प्रशासक आय.एस. चहल, **(पान २ वर..)**









# जानेवारीअखेर कोस्टल रोडचा पहिला टप्पा खुला होणार -मुख्यमंत्री

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबईकरांची वाहतूक कोंडीतून मुक्तता करतानाच वेळ आणि इंधनाची बचत करणाऱ्या दोन महत्त्वाकांक्षी प्रकल्पांची भेट नव्या वर्षांत मिळणार असल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी रविवारी (दि.७) सांगितले. मुंबई ट्रान्स हार्बर लिंक आणि कोस्टल रोड या दोन्ही प्रकल्पांना मुख्यमंत्र्यांनी भेट दिली. एमटीएचएल पाठोपाठ कोस्टल रोडचा पहिला टप्पा जानेवारी महिन्याच्या अखेरीस खुला होणार असल्याची घोषणा मुख्यमंत्र्यांनी या वेळी केली.

सलग दुसऱ्या दिवशी मुंबई डीप क्लीन मोहिमेत मुख्यमंत्री सहभागी झाले. सकाळपासून चर्नी रोड, मरीन ड्राईव्ह, नरीमन पॉईंट याठिकाणी ही



मोहीम राबवतानाचा मुख्यमंत्र्यांनी त्याचा विस्तार वाढवत एमटीएचएल आणि रायगड जिल्ह्यातील चिर्ले येथेही स्वच्छता मोहिमेचा शुभारंभ केला.

वरळीकडून मुंबईकडे जाणाऱ्या या बोगद्याचे काम पूर्ण झाले असून

### कोस्टल रोड बोगद्याचा दुसरा टप्पा मेअखेरीस

**कोस्टल रोडच्या पहिल्या टप्प्यातील बोगद्याचे काम झाले असून दुसऱ्या टप्प्यातील बोगदा मे अखेरपर्यंत पूर्ण होईल. या बोगद्याचा आकार देशातील सर्वांत मोठा असल्याचे मुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले. कोस्टल रोडवर टोल नाही, असे सांगत मुंबईकरांची वाहतूक कोंडीतून सुटका करतानाच वेळ आणि इंधनाची बचत करणारा हा प्रकल्प असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.**

जानेवारी महिन्याच्या अखेरीस तो वाहतुकीसाठी खुला करण्यात येईल, असे मुख्यमंत्र्यांनी जाहीर केले.

भारतात प्रथमच सकार्डो ही अत्याधुनिक वायूविजन प्रणाली बोगद्यात बसविण्यात आली आहे. त्यामुळे बोगद्यात धूर न साठता तो बाहेर फेकण्याचे काम या प्रणालीच्या माध्यमातून होणार आहे. या बोगद्यात आपत्कालीन उपाययोजना म्हणून प्रत्येक ३०० मीटरवर छेद बोगद्यांची व्यवस्था असून उपयोगिता सेवेसाठी बोगद्यामध्ये युटिलिटी बॉक्सची व्यवस्था करण्यात आली आहे.

या दुहेरी बोगद्यासाठी अद्ययावत वाहतूक व्यवस्थापन नियंत्रण प्रणालीची व्यवस्था करण्यात आली आहे. मुख्यमंत्र्यांनी या बोगद्याची पाहणी करत त्यातून गिरगाव चौपाटीपर्यंत प्रवास केला.

## कुडपण-पोलादपूर एसटीचे ब्रेक फेल; प्रवासी किरकोळ जखमी

### चालकाच्या प्रसंगावधानाने मोठा अपघात टळला

**पोलादपूर : प्रतिनिधी**

तालुक्यातील कुडपणकडे जाणाऱ्या एसटी बसचे ब्रेक फेल झाल्याने अपघात होऊन प्रवासी किरकोळ जखमी झाले. हा अपघात रविवारी (दि.७) दुपारी १२.३० वा.च्या सुमारास क्षेत्रपाळ हद्दीत घडला. दरीकडे गाडी नेण्याऐवजी डोंगराकडील गटारामध्ये गाडी नेऊन थांबविण्याचे प्रयत्न करणाऱ्या चालकाचे कौतुक होत आहे.

रविवारी दुपारी कुडपण ते पोलादपूर एसटी (एमएच १४ बीटी २७४९)चे ब्रेक फेल झाले. चालकाने प्रसंगावधान राखून दरीच्या दिशेने न जाता एसटी रस्त्याच्या कडेला घेत गटारामध्ये नेली व प्रवाशांचे प्राण वाचवले. यामध्ये पाच ते सहा प्रवासी किरकोळ जखमी झाले आहेत. चालक ए. एस. मांगडे यांनी प्रसंगावधान राखून प्रवाशांना वाचवले.



## कळंबोलीत मंगल अक्षतांसह घरोघरी निमंत्रण

**कळंबोली : रामप्रहर वृत्त**

साऱ्या जगाचे लक्ष वेधून राहिलेल्या मर्यादा पुरुषोत्तम श्रीराम मंदिराचे लोकार्पण सोहळा २२ जानेवारीला अयोध्या नगरीमध्ये होत आहे. अयोध्या येथून आलेल्या मंगल अक्षता कलश व त्यातील अक्षता निमंत्रण करण्यासाठी कळंबोलीतील घराघरांमध्ये पोहचत आहेत. कळंबोली येथील गुरुव्हिला सोसायटीमध्ये रविवारी (दि. ७) समितीच्या पदाधिकाऱ्यांनी अक्षता घरोघरी जाऊन निमंत्रण रूपाने दिल्या. या वेळी निमंत्रण देण्यासाठी आलेल्या सर्व बांधवांचे फुलांचा वर्षाव, साखर वाटप करून स्वागत करण्यात आले.

शेकडो वर्षांपासून हिंदू धर्मियांचे हृदयस्थानी असलेल्या प्रभू श्रीरामचंद्रांचे मंदिर साकारून पूर्ण झाले आहे. मंदिराचा लोकार्पण सोहळा २२ जानेवारी रोजी होत आहे.



या मंगल सोहळ्याचे निमंत्रण देण्यासाठी कळंबोलीतील घराघरातून मंगल अक्षतांचे निमंत्रणरुपी वाटप करण्यात आले. कळंबोलीतील गुरुव्हिला सोसायटीमधील १३५ सभासदांना मंगल अक्षता, माहितीपत्रक, राम मंदिराची छबी असलेले भेटकार्ड देण्यात आले. निमंत्रणासाठी आलेल्या बांधवांचे औक्षण करून स्वागत करण्यात आले.

२२ जानेवारीला प्रत्येक भारतीयांनी राममंदिर लोकार्पण सोहळा होत असताना घरात मंगलमय असे पाच दिवे लावायचे आहेत. नजीकच्या मंदिरात जाऊन प्रभू श्रीरामचंद्रांचा जयजयकार करायचा आहे, अशी माहिती ही या सदस्यांनी दिली आहे. या वेळी सोसायटीचे अध्यक्ष जगदीश पाटील, सचिव उमाकांत गव्हाणे, सहकारी गहिनाथ धुमाळ, जयकर सावंत, भाटी पंढरीनाथ कांबळे, आत्माराम पाटील, तानाजी ननावरे सिताराम दडस, अशोक जाधव, पदाधिकारी उपस्थित होते.

## पोलादपुरातील महिला कार्यकर्त्यांचा भाजपमध्ये प्रवेश

**पोलादपूर : प्रतिनिधी**

पोलादपूर विश्रामगृहामध्ये भाजपची संघटनात्मक बैठक आयोजित करण्यात आली होती. तालुका भाजप अध्यक्ष तुकाराम केसरकर यांच्या मार्गदर्शनाखाली गांजवणे गावातील कार्यकर्त्या मंगल झाडाणे यांनी त्यांच्या महिला समर्थकांसमवेत भाजपमध्ये जाहीर प्रवेश केला. या वेळी मंगल झाडाणे यांची महिलाध्यक्षपदी नियुक्तीही जाहीर करण्यात आली. पोलादपूर शहर भाजप अध्यक्षपदी राजाभाऊ दिक्षीत यांची फेरनिवड करण्यात आली.

बैठकीला जिल्हा सरचिटणीस बिपीन म्हामूणकर, संदीप ठोंबरे, राजन धुमाळ, समीर सुतार, महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्ष हेमा मानकर, मंजुषा कुद्रीमोती, पोलादपूर शहरातील अ‍ॅड. कलिका अधिकारी, जोशीबाई तसेच महिला कार्यकर्त्या मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

गेल्या महिन्यापासून तालुक्यातील कार्यकारिणीची पदे भरण्यासाठी अध्यक्ष तुकाराम केसरकर यांनी प्राधान्य दिले आहे. अध्यक्षांच्या शिफारसीखेरिज कोणाचीही परस्पर नियुक्ती वैध होणार नसल्याची माहिती केसरकर यांनी दिली आहे.



## सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर विद्यालयाची शैक्षणिक सहल



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

उलवे येथील सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर विद्यालयाच्या आठवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांची शैक्षणिक सहल आयोजित करण्यात आली होती. भीमाशंकर, शिवनेरी किल्ला व ओझर ही ठिकाणे सहलीसाठी निवडली होती.

माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे आशीर्वाद घेऊन विद्यालयाचे चेअरमन शरद खारकर यांच्या मार्गदर्शनाखाली ही सहल ४ जानेवारी रोजी सकाळी ५ वाजता मार्गस्थ झाली. विद्यार्थ्यांनी सहलीचा मनमुराद आनंद घेतला व महाराष्ट्रातील गड किल्ल्यांची माहिती घेतली.

एक दिवसाच्या सहलीचे आयोजन सहल प्रमुख, गुरुकुल प्रमुख, सांस्कृतिक विभाग प्रमुख व रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्या ज्योत्स्ना ठाकूर, उपशिक्षिका पी. आर. पवार व विद्यालयाचे मुख्याध्यापक डी. जी. हजारे यांनी केले होते.

विद्यार्थी नियोजित वेळेत सुरक्षितरीत्या परत आल्यामुळे पालकांनी व चेअरमन शरद खारकर यांनी विद्यालयाचे मुख्याध्यापक डी. जी. हजारे, ज्योत्स्ना ठाकूर व पी. आर. पवार यांचे अभिनंदन केले.

## मनोज जरांगे-पाटील यांची कुणबी नोंद सापडली

**शिरूर : प्रतिनिधी**

मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी लढा देणाऱ्या मनोज जरांगे-पाटील यांची कुणबी नोंद सापडलीय. शिरूरच्या तहसील कार्यालयामध्ये मोडी लिपीमध्ये ही नोंद आढळून आली आहे. यामुळे जरांगे-पाटील यांना कुणबी दाखला मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

मोडी लिपी संशोधन करणारे पथकात शिरूर दौऱ्यावर आले होते. त्यादरम्यान त्यांना मनोज जरांगे-पाटील यांचे वडील कुणबी असल्याचा पुरावा आढळून आला आहे. त्यामुळे आता त्यांना कुणबी प्रमाण मिळण्याचा मार्ग मोकळा झालाय. या वेळी त्यांचे वडीलदेखील शिरूर तहसील कार्यालयामध्ये हजर होते. नोंद मिळाल्याची माहिती अधिकाऱ्यांकडून देण्यात आली आहे.

मराठा समाजाला ओबीसीमधून आरक्षण देण्याचा मागणी करण्यात आली आहे, तर मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देण्यासंदर्भात समिती स्थापन करण्यात आली आहे. या समितीच्या माध्यमातून निजामाच्या काळापासूनची कागदपत्रे, मराठवाड्यातील मराठा समाजाची आर्थिक, शैक्षणिक आणि सामाजिक स्थिती, जुने रेकॉर्डस् यांची पडताळणी केली जात आहे.

मनोज जरांगेंच्या कुटुंबात एकही कुणबी नोंद आढळली नसल्याची माहिती समोर आली होती. जिथून मराठा आरक्षणाची लढाई सुरू झाली, त्या अंतरवाली सराटी गावातच एकही कुणबी नोंद न्या. शिंदे समितीला आढळली नव्हती, परंतु आता नोंदी सापडल्यामुळे मनोज जरांगे, त्यांचे कुटुंबीय आणि अंतरवाली सराटीचे गावकरी यांना दिलासा मिळाला आहे.



**पंढरपूर : येथे ओबीसी एल्गार मेळाव्याचे आयोजन केले असता पदाधिकाऱ्यांनी पांडुरंगाचे दर्शन घेतले. ओबीसी जनमोर्चाचे अध्यक्ष प्रकाशअण्णा शेंडगे, कार्याध्यक्ष चंद्रकांत बावकर, उपाध्यक्ष जे. डी. तांडेल, प्रा. टी. पी. मुंडे व इतर पदाधिकारी उपस्थित होते. विठ्ठल रखुमाई मंदिर समितीच्या वतीने त्यांचे स्वागत व सन्मान करण्यात करण्यात आला.**

पान १ वरुन

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांना जीवन गौरव पुरस्कार प्रदान

दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर पत्रकार संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. महेंद्र देशपांडे व सहकाऱ्यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले होते. सोहळ्यास लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या सुविद्य पत्नी शकुंतला ठाकूर, पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, भाजपचे तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, ज्येष्ठ नेते वाय.टी.देशमुख, तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, सरचिटणीस राजेंद्र पाटील, शिवसेना जिल्हाप्रमुख रामदास शेवाळे, महानगरप्रमुख प्रथमेश सोमण, माजी महापौर डॉ. कविता चौतमोल, माजी उपमहापौर चारुशीला घरत, सीताताई पाटील, भाजप शहराध्यक्ष अनिल भगत, जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, अनुसूचित जाती मोर्चा जिल्हाध्यक्ष अमित जाधव, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, महिला मोर्चा शहराध्यक्ष राजश्री वावेकर, माजी उपनगराध्यक्ष मदन कोळी, माजी नगरसेवक प्रकाश बिनेदार, एकनाथ गायकवाड, अ‍ॅड. मनोज भुजबळ, अजय बहिरा, तेजस कांडपिळे, निलेश बावीस्कर, माजी नगरसेविका दर्शना भोईर, अ‍ॅड. वृषाली वाघमारे, कुसुम म्हात्रे, वर्षा ठाकूर, अर्चना ठाकूर, अमोघ ठाकूर, आदेश ठाकूर, अपूर्व ठाकूर, आदित्य ठाकूर, संजय भगत, अजय भगत, सरपंच आनंद ढवळे, प्रमोद भिंगारकर, माजी पं. स. सदस्य भूपेंद्र पाटील, निलेश पाटील, लोकनेते दिवंगत दि.बा. पाटील यांचे पुत्र अतुल पाटील, संजय जैन, खारघर शहर मंडल अध्यक्ष प्रवीण पाटील, संध्या शारबिद्रे, सुहासिनी केकाणे, प्रतिभा भोईर, शिल्पा म्हात्रे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते, शाळा-महाविद्यालयांचे प्राचार्य, मुख्याध्यापक, शिक्षक आणि विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

## अटल सेतू लोकार्पण सोहळ्याच्या पूर्वतयारीचा मुख्यमंत्र्यांकडून आढावा

एमएमआरडीएचे आयुक्त डॉ. संजय मुखर्जी, सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक अनिल डिग्गीकर, प्रधान सचिव तथा माहिती जनसंपर्क महासंचालनालायचे महासंचालक ब्रिजेश सिंह, कोकण विभागीय आयुक्त डॉ. महेंद्र कल्याणकर, सहव्यवस्थापकीय संचालक कैलास शिंदे, नवी मुंबई आयुक्त राजेश नार्वेकर, नवी मुंबई पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे, रायगडचे जिल्हाधिकारी डॉ.योगेश म्हसे, पनवेल मनपा आयुक्त गणेश देशमुख यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

महाराष्ट्राच्या विकासाचा गेम चेंजर असलेल्या या सेतूच्या लोकार्पण कार्यक्रमाचे नियोजनदेखील दिमाखदार व्हावे. सिडको, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, जिल्हा व मनपा प्रशासन, राष्ट्रीय महामार्ग या सर्व यंत्रणानी आवश्यक त्या सर्व बाबींची तत्काळ पूर्तता करावी तसेच सर्व यंत्रणांनी कामामध्ये परस्पर समन्वय ठेवावा, अशा सूचना मुख्यमंत्री शिंदे यांनी या वेळी दिल्या. कार्यक्रम नियोजनामध्ये तज्ज्ञ व्यक्ती अथवा संस्था यांचे मार्गदर्शन घ्यावे, असेही त्यांनी सांगितले.अटल सेतूच्या शिवडी आणि चिरले या दोन्ही ठिकाणचा परिसर सुशोभित करण्यात यावा तसेच या संपूर्ण मार्गाची नियमित स्वच्छता ठेवावी. चिरले ते नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ मार्गांवर रोड फर्निचरचा वापर करावा. या मार्गाचे सुशोभीकरण, सौंदर्यीकरण, आवश्यकता असेल तेथे दुरुस्ती तसेच परिसरातील भिंती रंगविणे आणि हरित पट्टे तयार करण्याच्या सूचना या वेळी मुख्यमंत्री शिंदे यांनी दिल्या. पोलिसांना सूचना देताना मुख्यमंत्री शिंदे यांनी कायदा व सुव्यवस्था त्याचप्रमाणे पार्किंगचीही योग्य ती व्यवस्था करावी, मोठ्या प्रमाणावर वाहने या ठिकाणी येण्याची शक्यता आहे हे लक्षात घेऊन नियोजन करण्याच्या सूचना दिल्या. लोकांना कार्यक्रमाच्या ठिकाणी येण्यास कोणतीही अडचण होणार नाही यासाठी दक्षता घेण्यात यावी, असेही त्यांनी या वेळी सांगितले.

आढावा बैठकीनंतर मुख्यमंत्री शिंदे यांनी प्रत्यक्ष कार्यक्रमस्थळाची तेथील इतर व्यवस्थांची पाहणी केली तसेच उपस्थित अधिकाऱ्यांशी व्यवस्थेबाबत सविस्तर चर्चा करून सूचना दिल्या.

## अजिवली येथे आजपासून अखंड हरिनाम उत्सव

**पनवेल : वार्ताहर**

पनवेलमधील अजिवली येथील भव्य दिव्य अखंड हरिनाम उत्सवाचे आयोजन ८ ते १५ जानेवारीदरम्यान ज्ञानेश्वरी कंठभूषण हभप शांती ब्रम्हा एकनाथ महाराज कोष्टी (आळंदी) यांच्या व्यासपीठ नेतृत्वाखाली भव्य मैदानावर करण्यात आले आहे.

या आठ दिवसांत पहाटे ४ ते ६ काकड आरती, सकाळी ८ ते दुपारी १२ ज्ञानेश्वरी पारायण, दुपारी ३ ते ४ प्रवचन, संध्याकाळी ६ ते ७ हरिपाठ आणि रात्री ९ ते ११ या कालावधीत हरिकीर्तन असे दैनंदिन कार्यक्रम असणार आहेत. ८ जानेवारीला हभप संतोषमहाराज सते (भाताण) यांचे प्रवचन व रात्री हभप कैलासमहाराज निचिते (शहापूर) यांचे कीर्तन, ९ रोजी हभप जगन्नाथमहाराज शिवकर (केळवणे) यांचे प्रवचन व रात्री अमृताश्रम स्वामीमहाराज जोशीबाबा (बीड) यांचे कीर्तन, १० रोजी हभप हेमंतमहाराज दुर्गे (शेडुंग) यांचे प्रवचन व हभप पुरुषोत्तममहाराज पाटील (बुलढाणा) यांचे कीर्तन, ११ रोजी हभप बंधूराजमहाराज जांभळे (चांभार्ली) यांचे प्रवचन व हभप चैतन्यमहाराज निंबोळे (नाशिक) यांचे कीर्तन, १२ रोजी हभप अजितमहाराज खुटले (नांदगाव) यांचे प्रवचन व हभप सुधाकरमहाराज वाघ (श्रीक्षेत्र पैठण) यांचे कीर्तन, १३ रोजी हभप निलेशमहाराज ढवळे (शिवकर) यांचे प्रवचन व पुंडलिकमहाराज देहूकर (देहू) यांचे कीर्तन, १४ रोजी हभप सच्चिदानंदमहाराज कांबेकर यांचे प्रवचन व हभप भाषाप्रभू अ‍ॅड. चिदंबरेश्वरमहाराज साखरे (आळंदी) यांचे कीर्तन होणार आहे. हरिनाम उत्सवाची सांगता १५ रोजी हभप कंधारकरमहाराज (पंढरपूर) यांच्या काल्याच्या कीर्तनाने होणार आहे.

या अखंड हरिनाम उत्सवाला उपस्थित राहण्याचे आवाहन मंडळाच्या वतीने अध्यक्ष हभप संजय पाटील, उपाध्यक्ष संजय भगत, कार्याध्यक्ष डॉ. रवींद्र राऊत, खजिनदार हभप चंद्रकांत गोजे, संपर्क प्रमुख हभप सुभाष गायकर यांनी केले आहे.

## निवडक

### दुचाकी अपघातात एकाचा मृत्यू

**पनवेल :** स्वतःच्या ताब्यातील दुचाकीवरील ताबा सुटल्याने रस्त्याच्या डिव्हायडरला धडकून झालेल्या अपघातात एका व्यक्तीचा मृत्यू झाल्याची घटना पनवेलजवळील मानघर गावाच्या हद्दीत घडली आहे. महेंद्रसिंह अकलसिंह असे या मयत व्यक्तीचे नाव असून, मानघर गावात जेएनपीटी ते पनवेलकडे येणाऱ्या लेनवर पुलाच्या शेवटी मोटरसायकलचा अपघात झाल्याची माहिती पोलिसांना मिळाली. पोलीस घटनास्थळी गेले. या वेळी मोटरसायकल रस्त्याला लागून डिव्हायडरला धडकली होती. अपघातात महेंद्रसिंग जखमी अवस्थेत पडलेला दिसला. महेंद्रसिंग याला एमजीएम हॉस्पिटल, कामोठे येथे नेण्यात आले. डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले या अपघाताची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### निवेदक प्रवीण मोहोकर यांना पुरस्कार



**पनवेल :** प्रशिक एज्युकेशन सोसायटीच्या सतराव्या वर्धापन दिन सोहळ्यानिमित्त उत्कृष्ट निवेदक गौरव पुरस्कार २०२३ हा पुरस्कार केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री नामदार रामदास आठवले यांच्या हस्ते पनवेल येथील प्रसिद्ध निवेदक प्रवीण मोहोकर यांना पुरस्कार देऊन गौरव करण्यात आले आहे. प्रवीण हिरामण मोहोकर हे उत्कृष्ट निवेदक असून त्यांनी गेली २५ वर्ष निवेदक म्हणून राजकीय सामाजिक सांस्कृतिक क्षेत्रात निवेदक म्हणून काम करीत आहेत. गेली १५ वर्ष मल्हार न्यूज या टीव्ही चॅनेलवर पत्रकार न्यूज अँकर म्हणून काम करीत आहेत. आत्तापर्यंत ३०००च्या वरती प्रयोग केले आहेत आतापर्यंत विविध संस्थेच्या माध्यमातून विविध पुरस्कार त्यांना प्राप्त झाले आहेत. या पुरस्काराबद्दल त्यांचे विविध स्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे.

### महेश पाटील यांना पुरस्कार

**पनवेल :** सामाजिक, राजकीय क्षेत्रात गेल्या अनेक वर्षांपासून केलेल्या कार्याची दखल प्रशिक एज्युकेशन सोसायटीने दखल घेऊन यंदाचा धिरूभाई अंबानी स्मृती उद्योगरत्न गौरव पुरस्कार तोंडरे गावचे सुपुत्र व भाजपचे युवा नेते महेश पाटील यांना पुरस्कार केंद्रीय सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण राज्यमंत्री रामदास आठवले यांच्या हस्ते देण्यात आला.



प्रशिक एज्युकेशन सोसायटी देवीचा पाडा (नावडा) पनवेल येथील आयोजित कार्यकमात अनेक मान्यवरांना समाजकार्य क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल पुरस्कार देण्यात आले. या वेळी महाराष्ट्र सचिव अरुण जाधव, रायगड जिल्हा कार्याध्यक्ष विजय धोत्रे, पनवेल येथील मनोज कांबळे, भरत दातार, मुंबई चेंबूर येथील सुमित हिरवे, रमेश रुपवते हे त्या वेळी उपस्थित होते.

# सोनसाळखी चोरणारे दोघे गजाआड

## तीन दिवसांत सहा ठिकाणी घटना
## पनवेलमधील दोन गुन्हे उघडकीस



**पनवेल : वार्ताहर**

पनवेल शहरासह खांदेश्वर पोलीस ठाण्याच्या हद्दीत, मानपाडा पोलीस ठाण्याच्या हद्दीत व रोहा पोलीस ठाण्याच्या हद्दीत असे सलग तीन दिवसांत सहा चैन स्नॅचिंग करणाऱ्या दुक्कलीला पोलिसांनी गजाआड केले असून त्यांच्याकडून सुमारे सहा लाख ३२ हजार १२० रुपयाचे चोरीचे दागिने व गुन्ह्यात वापरलेली नवीन कोरी मोटरसायकल हस्तगत करण्यात आली आहे.

पनवेल शहरातील प्रभू आळी येथे राहणाऱ्या सुप्रिया टेंभे (वय ५४) यांच्या गळ्यातील १६ ग्रॅम वजनाची सोन्याची चैन तसेच तक्का येथे राहणाऱ्या मीनाक्षी महाजन यांच्या गळ्यातील १८ ग्रॅम वजनाचे सोन्याचे मंगळसूत्र मोटरसायकलीवरून आलेल्या दोन अज्ञात व्यक्तींनी खेचून ते पसार झाले होते. याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली होती.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक पवार व त्यांचे पथक सीसीटीव्ही फुटेजद्वारे तपास करीत असताना या दुक्कलीने खांदेश्वर पोलीस ठाण्याच्या हद्दीत, मानपाडा पोलीस ठाण्याच्या हद्दीतसुद्धा अश्याच प्रकारे गुन्हा केल्याचे दिसून आले अधिक तांत्रिक तपासामध्ये गुन्ह्यातील आरोपी नामे वीरू राजपूत (वय २३ रा. माणगाव) व त्याचा साथीदार सुखवीर रावल (वय २८, रा. माणगाव) यांना मानपाडा पोलिसांनी माणगाव येथून ताब्यात घेतले. अधिक चौकशीमध्ये या दोघांनी त्याचदरम्यान रोहा येथे सुद्धा दोन जणांचे दागिने खेचल्याची माहिती दिली.

त्यांच्या अटकेने एकूण सहा गुन्हे उघडकीस आले असून त्यांच्याकडून सुमारे सहा लाख ३२ हजार १२० रुपयाचे चोरीचे दागीने व गुन्ह्यात वापरलेली नवीन कोरी मोटारसायकल हस्तगत करण्यात आली आहे.

> **महिला वर्गाने लग्न समारंभ तसेच इतर कार्यक्रमाला दागिने घालून जाताना आपल्या सोन्याच्या दागिन्यांची काळजी घ्यावी, शक्यतो समारंभाच्या ठिकाणीच दागिने घालावेत व रस्त्याने जाताना काळजी घ्यावी. सन २०२३ मध्ये जवळपास चैन स्नॅचिंग चे वीस गुन्हे पनवेल शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडले असून त्यातील १८ गुन्हे उघडकीस आणले आहेत व उर्वरित दोन गुन्हयाचा तपास सुरु असून तेसुद्धा उघडकीस येण्याची दाट शक्यता आहे.**
>
> **–नितीन ठाकरे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक**

## खारघरमध्ये न्यू इअर कार्निव्हल रंगला




**खारघर : रामप्रहर वृत्त**

खारघर सेक्टर १० येथे न्यू इअर कार्निव्हल २०२४चे आयोजन माजी नगरसेवक अ‍ॅड. नरेश ठाकूर यांच्या वतीने रविवारी (दि. ७) करण्यात आले होते. या कार्निव्हलला आमदार प्रशांत ठाकूर व पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी भेट देत आयोजकांचे कौतुक करून सहभागींना प्रोत्साहन दिले.



सहभागींनी कार्निव्हलमध्ये आयोजित करण्यात आलेल्या खेळांचा आनंद मनमुराद लुटला. नवीन वर्षाच्या पार्श्वभूमीवर दरवर्षीप्रमाणे यंदाच्या वर्षीदेखील न्यू इअर कार्निव्हल २०२४चे आयोजन करण्यात आले होते. खेलो खारघर खेलो उमर ५५ कि दिल बचपन का या शीर्षकाखाली मनोरंजक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये लगोरी, रस्सीखेच, कॅरम, झुंबा, योगा, चमचा लिंबू, संगीत खुर्ची, टायर स्टिक त्याचबरोबर खाद्य पदार्थांचे स्टॉल लावण्यात आले होते.

या वेळी माजी नगरसेवक अ‍ॅड. नरेश ठाकूर, खारघर शहर उपाध्यक्ष किरण पाटील, खारघर शहर युवा मोर्चा अध्यक्ष नितेश पाटील, समीर कदम, अमर उपाध्याय, मीरा घुगे, नेहा यादव, सत्यपाल चूग, राम सोनवणे, अरविंद जैन, संध्या शारबिद्रे, अमित बोधई, शोभा मिश्रा, नीलकमल शर्मा, शितल सोमाणी, अन्नू सावंत आदी पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

## मॅरेथॉनच्या पार्श्वभूमीवर खारघर हिल ट्रेक

**खारघर : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता युवा मोर्चा महाराष्ट्रच्या वतीने भव्य क्रीडा व सांस्कृतिक महोत्सव सुरू आहे. यामध्ये नववर्षाच्या पहिल्या रविवारी (दि. ७) नमो खारघर हिल ट्रेकचे आयोजन करण्यात आले होते. पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी या ट्रेकिंगमध्ये सहभाग घेतला होता.

**परेश ठाकूर यांचा सहभाग**

रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्टस कॉम्प्लेक्स आणि खारघर रेसिडन्स वेल्फेअर असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने नमो चषक अंतर्गत रविवारी (दि.१४) 'एक धाव महिला नेतृत्वाखालील विकासासाठी' हे महिलांप्रती आदरभावना अधोरेखित करणारे घोषवाक्य घेऊन नमो खारघर मॅरेथॉन २०२४ ही स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर खारघर हिल ट्रेकचे आयोजन करून खारघर मॅरेथॉनमध्ये मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले.

या वेळी आयोजक नमो खारघर ट्रॅक तथा भारतीय जनता पक्षाचे खारघर शहर मंडळ अध्यक्ष प्रवीण पाटील, खारघर मंडळ उपाध्यक्ष किरण पाटील, युवा मोर्चा अध्यक्ष नितेश पाटील, प्रवीण भैरव, खारघर मंडळ सरचिटणीस दीपक शिंदे, आयुष्मान भारत खारघर अध्यक्ष, जयदीप गिराटे, निर्मला यादव, संदेश अल्विन्द्र, गीता चौधरी, उमेश पाटील, शुभ पाटील, महेश भगत, नीरज फडके, पप्पू खामकर आदी पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.







**पनवेल : भाजप शहर मंडल चिटणीस रूपेश नागवेकर यांना वाढदिवसानिमित्त महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर व भाजप शहर अध्यक्ष अनिल भगत यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, माजी नगरसेवक मनोहर म्हात्रे, विकास घरत, अजय बहिरा, प्रकाश बिनेदार, तेजस कांडपिळे, सांस्कृतिक सेलचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अभिषेक पटवर्धन आदी उपस्थित होते.**





**पनवेल : माजी उपमहापौर व भाजप उत्तर रायगड जिल्हा सरचिटणीस चारुशीला घरत यांना वाढदिवसानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर व महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी माजी महापौर डॉ. कविता चौतमोल, माजी नगरसेविका राजश्री वावेकर, कुसुम म्हात्रे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्त्या उपस्थित होत्या.**

# कळंबोलीतील भाजपच्या पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्र प्रदान

## आमदार प्रशांत ठाकूर, जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांच्या हस्ते वितरण

**कळंबोली : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पक्षाच्या कळंबोली मंडल पदाधिकाऱ्यांची नियुक्ती नुकतीच जाहीर करण्यात आली. या कार्यक्रमाचे आयोजन कळंबोली येथील तिथि बँक्वेट हॉल येथे शनिवारी (दि. ६)करण्यात आले होते. नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना मावळ लोकसभा निवडणूक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत नियुक्ती पत्र वाटप करण्यात आले.

जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमाला पनवेल विधानसभा निवडणूक प्रमुख नितीन पाटील कळंबोली मंडळ अध्यक्ष रविनाथ पाटील, जिल्हा उपाध्यक्ष सुभाष कदम, जिल्हा उपाध्यक्षा प्रिया मुकादम, जिल्हा चिटणीस संदीप म्हात्रे, जिल्हा अध्यक्ष (भ. वी अ.) बबन बरगजे, जिल्हा अध्यक्ष सहकार सेल अशोक मोठे, माजी नगरसेवक अमर पाटील, बबन मुकादम, राजू शर्मा, माजी नगरसेविका प्रमिला ताई पाटील, मोनिका माहनवर यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते. या वेळी भारतीय जनता पक्ष कळंबोली मंडळ समिती संरचना अध्यक्ष पदी रविनाथ पाटील यांची नियुक्ती करण्यात आली आहे तर सरचिटणीस पदी दिलीप बिस्ट, संजय दोडके, उपाध्यक्ष पदी आबासाहेब घुटुकडे, संदीप भगत, विनोद बोरसे, सुनील ढेंबरे, जोहेब पटेल, प्रियंका पवार, सचिव पदी संतोष गायकवाड, तुषार जगदाळे, राजेंद्र बागल, प्रकाश मुंबईकर, बायजा बारगजे, कोषाध्यक्षपदी प्रमिला पाटील, तसेच भारतीय जनता पार्टी कळंबोली मंडळ कार्यकारणी जाहीर करण्यात आली आहे.





यामध्ये महिला मोर्चा अध्यक्षपदी मनिषा निकम, युवा मोर्चा अध्यक्ष पदी गौरव नाईक, अनुसूचित जाती मोर्चा अध्यक्षपदी विष्णू गायकवाड, ओबीसी मोर्चा अध्यक्षपदी जनार्दन पाटील, अल्पसंख्यांक मोर्चा अध्यक्षपदी अझर शेख, आदिवासी मोर्चा अध्यक्षपदी राकेश नाईक, कामगार आघाडी उदय दत्ताजी गायकवाड, फ्रेंड्स ऑफ बीजेपी अजय श्रीवास्तव, जैन प्रकोष्ट माणक जी चोरडिया, अध्यात्मिक समन्वय प्रकोष्ठ लक्ष्मण भगवान जायभाये, सहकार सेल संतोष इंगुळकर, सोशल मिडिया सेल संकेत सावंत, आयटी सेल श्वेता प्रवीण नगराळे, भटके–विमुक्त आघाडी मधुकर जाठोत, सांस्कृतिक सेल श्रद्धा केमनाईक, ट्रान्सपोर्ट सेल दत्ता बिनवडे, पज्ञा सेल डॉ. हेमंत माने, आयुष्मान भारत सेल दिलीप बिष्ट, बेटी बचाव बेटी पढाव सेल आशा मिश्रा, व्यापार आघाडी संजय शिवराम धानसुरे, दक्षिण भारतीय सेल अजय आर्या, उत्तर भारतीय सेल केशवलाल यादव, वैद्यकीय सेल सागर पाटील, एनजीओ संपर्क आघाडी नरेश गुप्ता, शिक्षण सेल कृष्णज्ञा हाजारे, ज्येष्ठ कार्यकर्ता सेल संपत श्रीपत लगाडे, दिव्यांग सेल दत्तात्रय भिसे, कायदा सेल प्रवीण पाटील, क्रीडा प्रकोष्ठ सनी दोडके, रेल्वे प्रवासी प्रकोष्ठ राजेंद्र शर्मा, उद्योग आघाडी उत्तम सोन्नूर, पदविधर प्रकोष्ठ राजेंद्र बागल, अभियंता प्रकोष्ठ मयुर शिरोळे, राजस्थान प्रकोष्ठ सुरेंद्र बेनिवाल आहेत.

कळंबोली प्रभाग क्रमांक ७च्या अध्यक्षपदी चित्तरंजन शेट्टी, महिला अध्यक्ष पदी दुर्गावती सहानी, युवा अध्यक्षपदी सौरभ जगताप, कळंबोली प्रभाग क्रमांक आठ च्या अध्यक्ष पदी प्रकाश शेलार, महिला अध्यक्ष पदी भाग्यमुनी शहा, युवा अध्यक्ष पदी मनीष तिवारी, कळंबोली प्रभाग क्रमांक नऊ च्या अध्यक्ष पदी घनश्याम शर्मा, महिला अध्यक्ष पदी उमा राव, युवा अध्यक्षपदी लाडडी सिद्धू, कळंबोली प्रभाग क्रमांक दहा च्या अध्यक्ष पदी रामा महानवर, महिला अध्यक्षपदी शुभांगी निरमळे, युवा अध्यक्षपदी अक्षय काळेबाग या सर्व नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना मावळ लोकसभा निवडणूक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत नियुक्ती पत्र वाटप करण्यात आले.

## पनवेलमध्ये रंगणार आगरी अस्मिता साहित्य संमेलन

**उरण : वार्ताहर**

अखिल भारतीय आगरी साहित्य संस्था अलिबागच्या वतीने, दुसरे आगरी अस्मिता साहित्य संमेलन २८ जानेवारी रोजी पनवेल येथील महात्मा ज्योतिबा फुले आगरी समाज सभागृह येथील लोकनेते दि.बा. पाटील साहित्य नगरीत आयोजित करण्यात आले आहे. आगरी अस्मिता साहित्य संमेलनाचे उद्घाटन आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते करण्यात येणार आहे.

या वेळी आमदार महेंद्र दळवी, आमदार महेश बालदी, सभागृह नेते परेश ठाकूर, संस्थापक कैलास पिंगळे, संमेलन अध्यक्ष सुरेश भोपी आदी सर्व पक्षीय नेते उपस्थित राहणार आहेत. या वेळी स्वागताध्यक्ष अनिल भगत, कार्याध्यक्षा मीनल माळी, उपकार्याध्यक्ष रमाकांत म्हात्रे, कृष्णा जोशी, चंद्रकांत कांडपिळे आदींच्या हस्ते मान्यवरांचे स्वागत करण्यात येणार आहे.


## संपादकीय

# लोकाभिमुख सरकार

इच्छाशक्ती असेल तर शासन-प्रशासनाच्या माध्यमातून काय काय करता येऊ शकते हे महाराष्ट्रातील डबल इंजिन सरकारने दाखवून दिले आहे. राज्यात महायुतीचे सरकार अस्तित्वात असून केंद्रातील मोदी सरकारचे भक्कम पाठबळ या सरकारला लाभत असल्याने विकासाची गंगा विविध योजना, उपक्रम, निर्णयांच्या माध्यमातून सर्वदूर पोहचत असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे. गतिमान, लोकाभिमुख व पारदर्शी कारभारातून महायुती सरकारने जनतेची मने जिंकली असून हे सरकार व आधीचे महाआघाडी सरकार यांच्यातील फरकही यानिमित्ताने ठळकपणे दिसून येतो.

**एखाद्या राज्याचा विकास त्या राज्यातील राज्यकर्त्यांच्या मानसिकतेवर अवलंबून असतो. सरकार जितके सक्षम व सक्रिय तितका विकास होत असतो. तसे पाहिले तर महाराष्ट्र हे पहिल्यापासून देशातील एक प्रमुख राज्य आहे. देशाच्या एकूण महसुलातील सर्वांत जास्त वाटा महाराष्ट्र उचलतो. विविध क्षेत्रांमध्ये या राज्याचा डंका राहिलेला आहे. मधल्या काळात मात्र या विकासाला ब्रेक लागला होता. उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील महाविकास आघाडी सरकारच्या काळात राज्याची अक्षरशः अधोगती झाली. कोरोनाच्या नावाखाली स्वत: तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी घरून कारभार पाहणे पसंत केले होते. नेमके त्यांच्या उलट विद्यमान मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आहेत. पायाला भिंगरी लावून ते राज्यभर फिरत आहेत. त्यांना अभ्यासू नेते व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मोलाची साथ आहे, तर दुसरे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचीही प्रशासनावर मजबूत पकड आहे. अशा प्रकारे ही त्रिमूर्ती समरसून राज्यात एक नवा अध्याय लिहित आहे. या सरकारचा शासन आपल्या दारी हा कार्यक्रम तर वाखाणण्याजोगा आहे. शासन आणि प्रशासन एकत्रितपणे प्रत्येक जिल्ह्यात जाऊन तेथील लाभार्थ्यांना आवश्यक ते वाटप केले जात आहे. पूर्वी सरकारी काम आणि सहा महिने थांब अशी म्हण होती, कारण एकाच कामासाठी शासकीय कार्यालयांमध्ये हेलपाटे मारावे लागत असत. त्यात नागरिकांच्या वेळ व पैशांचा अपव्यय होत असे. हे चित्र बदलण्याचे काम राज्यातील सरकार करीत आहे. सत्ताधारी वेगवान पद्धतीने काम करीत असल्याने प्रशासकीय यंत्रणाही जोमाने काम करीत आहे. मोठ मोठे प्रकल्प, उद्योग राज्यात येत आहेत. दळणवळणाच्या सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहेत, जेणेकरून ये-जा करणे सोयीस्कर होईल. यापैकीच एक अटलबिहारी वाजपेयी शिवडी-न्हावाशेवा अटल सेतू. या प्रकल्पाचे लोकार्पण १२ जानेवारी रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या हस्ते होणार आहे. हा भारतातील सर्वांत मोठा, तर जगातील १२व्या क्रमांकाचा सागरी सेतू आहे. २२ किमी लांबीच्या या सेतूमुळे मुंबई ते नवी मुंबईत अवघ्या २० मिनिटांत जाता येणार आहे. विशेष म्हणजे हा सेतू मार्ग मुंबई-गोवा महामार्ग, वसई-विरार, नवी मुंबई, रायगड जिल्ह्याला जोडला जात असल्याने विविध मोठे उद्योग, विकासात्मक प्रकल्प नवी मुंबई परिसरात येणार असल्याने परिसराचाही विकास होणार आहे. अशा प्रकारे नव्या वर्षात विविध प्रकल्पांचे लोकार्पण होऊन नागरिकांना सोयीसुविधा उपलब्ध होणार आहेत. त्यामुळे खऱ्या अथाने हे सरकार लोकाभिमुख काम करीत असल्याचे पहावयास मिळते. चांगल्या हेतूने एकत्र येऊन कार्यरत राहिल्यास कशा प्रकारे विकास आणि प्रगती करता येते हेच यातून अधोरेखित होते.**

# साळावचे बिर्ला गणेश मंदिर भक्तांचे श्रद्धास्थान



रायगड जिल्हा हा ठाणे, पुणे, मुंबई व रत्नागिरी जिल्हांना जवळचा जिल्हा आहे. अशा या जिल्हातील मोजक्याच तालुक्यांना समुद्रकिनारा लाभला आहे. त्यांतील मुरूड-जंजीरा तालुका म्हणजे प्रति गोवा मानले गेले असल्याने एक दिवसांचे पर्यटनस्थळ म्हणून पर्यटकांचे खास आकर्षण आहे. काही वर्षापुर्वी मुरूड तालुक्यात साळाव येथे बिर्ला उद्योग समुहाने विक्रम वसाहत प्रकल्पांच्या नजीकच्या संजयनगर कडील छोटयाश्या टेकडीवर उभारलेले विक्रम विनायक मंदिर बांधले. हे मंदिर अल्पावधीत भक्ताचे श्रध्दास्थान व पर्यटनस्थळ म्हणून प्रसिध्दीस आले आहे.

रोहा-रेवदंडा कुंडलिका खाडीलगत व रेवदंडा-रोहा मुख्य रस्तावरील साळाव मा गावानजीक छोट्याश्या टेकडीवर बिर्ला समुहाने हे विक्रम विनायक मंदिर परंपरेने बांधले आहे. मंदिर राजस्थान व गुजरात मेथील संगमवरी दगडातून उभारलेले आहे. मुंबईच्या शापुरजी मालनजी बिल्डर्सनी भव्य व दिव्य असे बांधकाम केले आहे.

टेकडीवर मंदिराकडे जाण्याकरीता पामर्या व मोटर रस्ता असे दोन मार्ग आहेत. टेकडीच्या पायथ्यांशी दोन सुदंर सिंह शिल्पे आहेत. मंदिराचे बांधकाम दोन सभा मंडप व गर्भगृह अशा प्रकारचे असून सभा मंडपाचे छत संपुर्णपणे पारदर्शक असून चारी बाजूना सभामंडप खुला आहे. मुख्म गाभार्यास श्री विनायकांची भव्य संगमवरी मुर्ती आहे मुर्तीसोबत शंकर-पार्वती, दुर्गा माता, रिध्दीसिध्दी, राधाकृष्ण व सुर्यदेवाचीही मुर्ती आहे. सर्व मुर्ती जयपुरहून आणलेल्या कसबी कारागिरांनी घडविल्या असून आकाशात उंच सुळक्यासारख्या जाणार्या शुभ्र संगमवरी कळसामुळे मंदिराची शोभा विशेषत्वाने वृध्दींगत झालेली आहे.

मंदिर म्हटले की पूजा अर्चा करण्याचा मुद्दा आलाच या मंदिरासाठी वृंदावन मेथून खास दोन पुजारी आणले आहेत. सकाळी सहा ते साडेअकरा व सायंकाळी साडेचार ते नऊ या वेळात भक्तांना मंदिरात प्रवेश दिला जातो. मंदिरात परिसरात रमणीय बाग आहे बागेत सायंकाळी अविस्मरणीय विद्युत रोषणाई पहावयास मिळते. मुळातच निसर्गरम्य असलेल्या या परिसरात शोभा वाढविणारे हे मंदिर निर्सगाशी एकरूप झालेले दिसते. बागेमध्मे स्व. आदित्य बिर्ला यांचा पुतळा आहे. बागेत कारंजे असून तेही विद्युत रोषणाईत अधिकच प्रेक्षणिय झाले आहे.

मुंबई-पुणे-रत्नागिरी अशा अनेक शहरातून भाविक व पर्यटक येथे येत असतात विशेषतः संकष्ट चतुर्थीसारख्या धार्मिक महत्वाच्या दिवसासह रविवारी व अन्य सुट्टीच्या दिवशी पर्यर्टकांसह भाविकांचे मोठे लोंढे येतात. विशेष म्हणजे सर्वधर्मिम नागरिक दर्शन घेतात. मंदिरामुळे स्थानिकांना व्यवसाय निर्माण झाला आहे. या परिसरात दिवसभर पुण्माच्या सारसबागेसारखे स्वरूप प्राप्त झाले आहे. येथील ऑटोरिक्षा, सितारा व्हॅन, यांनाही पर्यटकांमुळे उद्योगधंदा मिळाला आहे. मंदिराच्या समोरील भागात रसवंती गृह, खाद्य पदार्थाचे विविध स्टॉल, छोटी उपाहार गृहे, नारळ व फुलांच्या हातगाडया, चणे, फुटाणेवाले, ते स्थानिक परिसरातील भाजी विक्रेते व फळ विक्रेते या सर्वांना व्यवसाय निर्माण झाला आहे. प्रकल्पाने मंदिराचा समोरील भागात खासगी बस वाहनासाठी वाहनतळ उभारला आहे मात्र वाहनाची आवक पहाता तो आता अपुरा पडत आहे. पर्यायाने वाहने रस्तावर उभी करावी लागत असल्याने ट्रफिक समस्या निर्माण होऊन अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

अलिबाग आगाराच्या दिवसभरात तुरळक बस फेऱ्या या मार्गी धावतात, पेण आगाराचे शनिवारी व रविवारी ठेवलेली बसफेरी रद्द केली आहे. पर्यटकांनी मुरूड,पेण, रोहा, महाड, कर्जत, श्रीवर्धन, बस आगारातून बिर्ला विनायक मंदिराकडे पर्यटन बससेवा सुरू करावी अशी मागणी करण्यात येत आहे.

मंदिराच्या प्रवेशद्वाराजवळ दोन ते चार सुरक्षा अधिकारी ठेवण्यात आले असून त्या ठिकाणी भक्तमंडळीच्या सामानाची तपासणी होते. सामान ठेवण्यासाठी स्वतंत्र व्यवस्था केली असून परवनागी शिवाय कोणालाही छायाचित्र काढता येत नाही विशेष करून मासिक, साप्ताहिके, दैनिक आदी प्रसिध्दी माध्यमातून काम करणार्यांना छायाचित्र काढण्यांस परवानगी आहे मात्र तशा प्रकारचा सुरक्षा अधिकारी वर्गाकडे संपर्क साधावा लागतो असे हे बिर्ला मंदिर एक दिवशीय पर्यटनक्षेत्र बनलेले व भाविकांचे श्रध्दास्थान आर्थिक व वेळेच्या दृष्टीचे सोयीचे स्थळ आहे. प्रत्यक्ष भेट दिल्यावर निसर्गाच्या आस्वादाचा पर्यटक बनल्याचा मनाला आनंद नक्कीच मिळतो.

**-महेंद्र खैरे, रेवदंडा**

# ज्ञानपीठ पुरस्कारप्राप्त प्रसिद्ध बंगाली लेखिका आशापूर्णा देवी

आशापूर्णा देवी या प्रसिद्ध बंगाली लेखिका होत्या. ज्ञानपीठ पुरस्काराच्या मानकरी होत्या. परंपरेच्या जोखडात बांधलेल्या स्त्रीच्या स्थितीचं, तिच्या प्रश्नाचं एकूणच समस्त बंगाली भावजीवनाचं दर्शन, अत्यंत सहज, सरळ पण प्रभावी शैलीत आपल्या साहित्यातून त्यांनी घडवलं. त्यांचा जन्म ८ जानेवारी १९०९ रोजी कोलकात्यामध्ये एका मध्यमवर्गीय बंगाली कुटुंबात झाला. तत्कालीन सामाजिक स्थितीमुळे त्या शाळेत कधीच गेल्या नाहीत.

पण घरात त्यांना अक्षर ओळख करून दिली होती. वसुमती साहित्यमंदिराद्वारा प्रसिद्ध झालेली सगळी पुस्तके तर आशापूर्णादेवींनी वाचली होतीच, पण कालीसिंह लिखित महाभारताची पारायणं केली होती. रवींद्रनाथांच्या अनेक कविता, गीते त्यांना पाठ होती. घरामध्ये भाऊ अभ्यास करायला लागला की, ऐकून, ऐकून, त्याच्या पुस्तकात डोकावून, ते धडे, त्या कविता त्यांच्या पाठ होऊन जात असत.



विवाहानंतर पती कालीदास बाबू नाग यांच्या प्रोत्साहनामुळे त्या अविरत लिहीत राहिल्या. सारं घरकाम उरकून रात्रीच्या निवांतवेळी, घरातच असलेल्या पतीच्या टाईपरायटरवर त्या साहित्यनिर्मिती करू लागल्या. वयाच्या १३ व्या वर्षी त्यांची 'बाइ देर डाक' ही पहिली कविता शिशूसाथी मासिकात प्रसिद्ध झाली. त्यांची दोनशेहून अधिक पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत. १७८ कादंबर्या, ३० कथासंग्रह, ४७ बालवा स्वरूपातील पुस्तके, शिवाय इतर २५ पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत.

पुरोगामी विचारांच्या या लेखिकेला लीला पुरस्कार, कोलकाता विद्यापीठ (१९५४), पद्मश्री (१९७६), ज्ञानपीठ पुरस्कार, हरनाथ घोष पदक, बंगीय साहित्य परिषद (१९८८), जगतरानी स्वर्ण पदक, कोलकाता विद्यापीठ (१९९३) इत्यादी पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. अशा या श्रेष्ठ लेखिकेचे १३ जुलै १९९५ रोजी निधन झाले.

**(साभार : इंटरनेट)**



## बदलते तंत्रज्ञान

# 'एआय'निर्मित आवाज ओळखण्यासाठी टिप्स...

प्रगत तंत्रज्ञानामुळे जशी व्यक्ती प्रगत होत गेली तसतसे तिला अशा चुकीच्या गोष्टी करण्याचे अनेक नवनवीन मार्ग खुले झालेले आहेत. अशातच एआय या तंत्रज्ञानाचा वापर करून आपल्या ओळखीच्या व्यक्तीच्या आवाजाची नक्कल करून फोनवरूनच एखाद्याची फसवणूक केल्याबद्दल किंवा फेक/खोटा फोन करून व्यक्तीला गंडवल्याच्या बातम्या सध्या आपल्याला सगळीकडे पाहायला मिळत आहे. अशा स्कॅमर्सना कसे ओळखायचे यांच्या काही टिप्स...




आपल्या जवळच्या, ओळखीच्या व्यक्तींनी जर अचानक आणि अवेळी फोन करून ते अडचणीत आहे किंवा त्यांना ठराविक गोष्टींची मदत हवी असल्याचे सांगितले, तर आलेला फोनकॉल हा खोटा असण्याची शक्यता असते. फसवणूक करणारे नेहमी अशा गोष्टींचा आधार घेतात. अशावेळेस फोनवरून बोलणारी व्यक्ती ते अत्यंत अडचणीत असल्याचे किंवा त्यांना तातडीने मदत हवी असल्याचे भासवत तुमच्याकडून ते पैशांची मदत घेण्याचा प्रयत्न करतील. अवेळी अचानक आलेल्या फोनवरून जर कुणी अशी मदत मागत असेल तर सर्वप्रथम सर्व प्रकारची एकदा व्यवस्थित चौकशी करावी, खात्री करावी, परंतु तुम्हाला यात काही गडबड वाटल्यास ताबडतोब त्यावर कारवाई करावी.

एआय आवाज क्लोनिंग करण्यात म्हणजे आवाजाची नक्कल करण्यात जरी तरबेज असेल तरी त्याच्याकडून अगदी लहान चुका होतात. त्या चुका शोधण्याच्या प्रयत्न करा. जसे की बोलण्याची पद्धत. प्रत्येक व्यक्तीची बोलण्याची एक विशिष्ट पद्धत असते. जर आलेल्या फोनवरची व्यक्ती नेहमीपेक्षा वेगळी किंवा विचित्र बोलत असेल तर सावध राहा. शब्द उच्चारतानासुद्धा एआय चुकीचे किंवा काही शब्द विचित्र, रोबोटिक पद्धतीने उच्चारते. असे जाणवल्यास बनावट फोनकॉल समजावे.

तुमच्या बँकेबद्दल, बँक कार्ड्सबद्दल किंवा इतर कोणत्याही वैयक्तिक माहितीबद्दल फोनवरील व्यक्ती विचारात असेल तर त्यांना ती अजिबात देऊ नका. कोणतीही व्यक्ती, कंपनी किंवा स्वतः बँक तुम्हाला फोनवरून अशी माहिती विचारणार नाही. त्यामुळे कुणी अशी माहिती देण्यास सांगितले तर सतर्क राहावे. असे काही लक्षात आल्यास ताबडतोब पोलिसांत तक्रार दाखल करा.

# समाजसुधारक केशव चंद्र सेन



## निमित्त

ब्राह्मो समाजाचे प्रवर्तक आणि भारतातील प्रमुख बंगाली समाजसुधारक केशव चंद्र सेन यांचा आज स्मृतीदिन (८ जानेवारी १८८४) आहे. कोलकात्याजवळील गरिफा हे सेन यांचे मूळ गाव होय. कोलकात्यातील कोलुतोला भागात प्यारे मोहन व शारदादेवी या दांपत्यापोटी केशवचंद्र यांचा जन्म (१९ नोव्हेंबर १८३८) झाला. त्यांचे वडील टांकसाळीत अधिकारी होते. परमार्थाविषयीची ओढ आणि बुद्धिवाद यांची देणगी सेन यांना आईकडून मिळाली. त्यांचे आजोबा रामकमल सेन बंगालच्या पुनरुज्जीवन चळवळीतील सक्रिय व्यक्तिमत्त्व होते.

हिंदू महाविद्यालय (१८१७), स्कूल बुक सोसायटी (१८१८), संस्कृत महाविद्यालय (१८२४) यांच्या स्थापनेत त्यांचा सहभाग होता. सेन हे हिंदू प्रशालेतून प्रवेशपरीक्षा उत्तीर्ण झाले (१८५३). नंतर हिंदू महाविद्यालयातून ते पदवीधर झाले (१८५६). या सुमारास जगनमोहिनी देवी या युवतीशी ते विवाहबद्ध झाले (१८५६). सुरुवातीस त्यांनी बंगाल बँकेत काम केले (१८५९-६१). त्यानंतर १८६६ मध्ये काही काळ ते टांकसाळीत अधिकारी होते. विद्यार्थिदशेत त्यांनी तत्त्वज्ञानाचा अभ्यास केला तसेच अनेक तत्त्ववेत्यांचे ग्रंथ वाचले; तथापि त्यांच्या मनावर सर्वांत जास्त परिणाम राजनारायण बसू यांच्या ब्राह्मोइझम या ग्रंथाचा झाला. त्यानंतर ते ब्राह्मो समाजाकडे आकृष्ट झाले (१८५७).

सेन यांनी 'यंग बेंगाल मूव्हमेंट'चा अभ्यास करून 'यंग बेंगाल, धिस इज फॉर यू' (जून १८६०) या लघुप्रबंधात आपली परखड मते मांडली. मनाचा संबंध ज्ञानाशी आणि हृदयाचा संबंध श्रद्धेशी, करुणेशी आणि नीतितत्त्वांशी असतो. त्यांनी अनेक शहरांना भेटी देऊन इंग्रजीमध्ये बाह्मो समाजाचा प्रचार प्रभावीपणे केला. तत्पूर्वी १८५५ मध्ये महाविद्यालयीन काळात त्यांनी कोलुतोला भागात प्रौढांसाठी सायंशाळा सुरू केली. नाटकमंडळीच्या मदतीने सेन यांनी उमेशवंत दत्तांचे विधवाविवाह हे नाटक रंगभूमीवर आणले. ब्राह्मो समाजामध्ये स्त्रियांना प्रवेश नव्हता, तेव्हा केशवचंद्र सेन यांनी स्वतःच्या पत्नीस सामुदायिक उपासनेमध्ये सामील करून घेतले. १८६० मध्ये सामाजिक सुधारणेला वाहून घेणाऱ्या मित्रांची संघटना 'संगत सभा' या नावाने स्थापन केली. त्यांनी चर्चमध्ये आंतरजातीय विवाह घडवून आणला (१८६२). स्त्रियांकरिता वामबोधिनी पत्रिका हे बंगाली भाषेतील मासिक सुरू केले (१८६४). तसेच ब्राह्मिका समाज नावाचे पत्रक ब्राह्मो स्त्रियांसाठी सुरू केले (१८६५). त्यांनी बहुतेक वृत्तपत्रे बंगालीत काढली. इंडियन मिरर हे १८७१मध्ये दैनिक झाले. सेन यांनी वृत्तपत्रे व व्याख्याने यांद्वारे ब्राह्मो समाजाची तत्त्वे भारतभर प्रसृत केली. या तत्त्वांत अस्पृश्यता निवारण, स्त्री शिक्षण, जातिभेद निर्मूलन, दारूबंदी, आंतरजातीय विवाह वगैरेंचा अंतर्भाव होता. त्यासाठी त्यांनी जीवाचे रान केले आणि धर्मोपदेशकाची प्रांजल भूमिका बजावली. त्यांच्या या कार्याचा गौरव 'ब्रह्मानंद' या उपाधीने करण्यात आला.

केशवचंद्रांनी ख्रिस्तचरित्र व ख्रिस्ताचा उपदेश यांची महती सांगणारी काही पुस्तके लिहिली; तथापि त्यांचा भर व्याख्यानांद्वारे विचार प्रसृत करण्यावरच होता. ब्राह्मो समाजाच्या राजा राममोहन रॉय, देवेंद्रनाथ या दोन प्रेषितांच्या नंतरचे तिसरे स्थान त्यांचे होते. एकोणिसाव्या शतकातील धार्मिक आणि सामाजिक स्थित्यंतरे व सुधारणांत केशवचंद्र यांची भूमिका मौलिक असून वैशिष्ट्यपूर्ण होय.ऐन उमेदीत अल्पशा आजाराने त्यांचे कोलकाता येथे निधन झाले.

**(साभार : विकासपीडिया)**


## क्लिक...क्लिक...!



**पनवेल : मार्गशीर्ष महिन्यात करण्यात येणाऱ्या महालक्ष्मीच्या व्रतासाठी पूजेचे साहित्य खरेदी करण्यास बाजारपेठेत गर्दी असते.**

## आरोग्य प्रहर

# शाकाहारी आहारात 'असे' राखा वैविध्य अन् संतुलन



शाकाहार पाळताना सगळ्यात महत्त्वाचा मुद्दा म्हणजे महत्वाचे अन्नघटक आणि त्यांचे वाढीव प्रमाण. धान्य, फळ, भाज्या यातून मिळणारे भरपूर कार्ब्स या कर्बोदकांचे वाढीव प्रमाण त्यावर कसं संतुलन ठेवायचं? शिवाय भारतीय शाकाहारी आहारात प्रथिनाचे प्रमाण अत्यल्प आहे. शाकाहारी आहारामध्ये विशेष पोषणमूल्य म्हणजेच जीवनसत्व क, बी १२ यांचे यांसारखा जीवनसत्वांचे प्रमाण नगण्य असते त्यामुळे शाकाहारी आहाराचे पालन करताना विचारपूर्वक आणि प्रमाणबद्ध आखणी करणे अत्यावश्यक ठरते.

राजगिरा , जव , काळे तांदूळ , उकडे तांदूळ यासारखी धान्ये ऋतुमानातील बदलानुसार आहारात समाविष्ट करायला हवीत. नाचणी, ज्वारी, बाजरी, राजगिरा, शिंगाडा यासारख्या तृणधान्यांच्या कर्बोदकांचे योग्य प्रमाण राखण्यासाठी आणि जीवनसत्त्वे मुबलक प्रमाणात पुरविण्यासाठी उपयोग होतो.

धान्याचे आंबील, घावण, सत्त्व या स्वरूपात आहारातील समावेश रक्तातील शर्करेचे प्रमाण उत्तम राखतो आणि ज्यांना उच्च रक्तदाब , अस्थमा, हाडांचे विकार आहेत त्यांच्यासाठी देखील धान्याची आंबवलेले रूपे सकस आहाराचा भाग होऊ शकतात.

डाळी आणि कडधान्ये कर्बोदके आणि प्रथिने यांचे पूरक प्रमाण बाळगणं. केवळ एकाच प्रकारची डाळ नियमित न वापरता डाळींचे विविध प्रकार समाविष्ट करावेत. रात्रभर भिजवून, कधी आंबवून, कधी मिश्र पीठ म्हणून कधी धान्यांसोबत एकत्र करून डाळी सेवन कराव्यात.

पालेभाज्या आणि फळभाज्या यांचा आहारात सलाड म्हणून देखील समावेश करता येऊ शकतो. पालेभाज्यांसोबत फळभाज्या एकत्र शिजवून खाणे किंवा डाळींसोबत वेगवेगळ्या फळभाज्यांचे प्रमाण आहारात वाढविल्यास आहारातील पोषणमूल्याचे प्रमाण वाढू शकते.

ज्या ऋतूमध्ये जी फळे उपलब्ध असतील ती नैसर्गिक स्वरूपात खाल्ल्याने फलाहार उपयुक्त ठरू शकतो. आणि एका दिवशी फक्त सहा-आठ फळे खाल्ल्यास केवळ कर्बोदकांचेच प्रमाण वाढणार आहे हेही लक्षात घ्यायला हवे. विशेषतः फलाहार करणाऱ्यांनी सोबत तेलबिया किंवा प्रथिनांसह प्रमाणाकडे लक्ष पुरविणे आवश्यक ठरते.

# नव्या वर्षात नवी मुंबईकरांना मिळणार विविध नागरी प्रकल्प

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

आगामी नवीन वर्ष हे निवडणुकांचे असले, तरी या वर्षात नवी मुंबईकरांना विविध नागरी प्रकल्प मिळणार आहेत.





गेली तीन वर्षे बांधकाम सुरू असणारे सायन्स पार्क २०२४च्या वर्षाअखेरीस नवी मुंबईकरांच्या सेवेत दाखल होणार आहे, असा विश्वास पालिकेचे आयुक्त राजेश नार्वेकर यांनी व्यक्त केला आहे.

याखेरीज नवी मुंबईकर शहरावर लवकरच सीसीटीव्हीचे नियंत्रण असणार आहे. शहरवासीयांना ऐरोलीतील दुसरे नाट्यगृहदेखील यावर्षभरात उपलब्ध होणार आहे. त्यामुळे आगामी वर्ष हे नवी मुंबईकरांसाठी प्रकल्पांची पूर्तता करणारे ठरेल, असे नार्वेकर यांनी सांगितले आहे.

कोविडसारख्या महामारीला मोठ्या धैर्याने तोंड दिल्यानंतर आता नवी मुंबई महापालिका प्रशासन स्थिरावले आहे. निवडणूक न झाल्यामुळे महापालिकेचा कारभार प्रशासकाच्या हाती आहे. एकीकडे खर्चाचा भार वाढत असला, तरी दुसरीकडे प्रशासन अधिक लोकाभिमुख करण्यावर आयुक्त राजेश नार्वेकर यांनी भर दिला आहे.

नागरिकांना पायाभूत सुविधांपेक्षा अधिक वेगळ्या दर्जाच्या सुविधा देण्यावर नार्वेकर यांचा कल आहे. त्यानुसार चालू २०२४ या वर्षात नवी मुंबईकरांना प्रतीक्षेत असणारे सायन्स पार्क मिळणार आहे. नेरूळ येथील वंडर्स पार्कमध्ये तयार होत असणारे सायन्स पार्कची भव्य इमारत शहराच्या सौंदर्यात आणि नव्या पिढीच्या ज्ञानात भर घालणारी ठरणार आहे. आकाशातील गुढमय आणि रहस्यमय माहितीसह अत्याधुनिक तंत्रज्ञानाचे शिक्षण देणारी ही वास्तू ठरणार आहे.

# अटल सेतू लोकार्पणाच्या पार्श्वभूमीवर नियोजन बैठक

## आमदार महेश बालदी यांची उपस्थिती

**उरण : वार्ताहर**

अटल सेतू लोकार्पणाच्या पार्श्वभूमीवर भागूबाई हायस्कूल द्रोणागिरी येथे रविवारी (दि. ७) आमदार महेश बालदी यांच्या अध्यक्षतेखाली नियोजन बैठक घेण्यात आली. दरम्यान, उरण खारकोपर रेल्वे प्रकल्पही खुला होण्याची शक्यता असल्याने त्याचाही आढावा या बैठकीत घेण्यात आला.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते शिवडी न्हावा सिलिंकचे लोकार्पण १२ जानेवारी २०२४ रोजी होणार आहे. त्याचा जाहीर कार्यक्रम प्रस्तावित लोकनेते दि. बा. पाटील इंटरनॅशनल विमानतळ परिसरात होणार आहे. कार्यक्रमाच्या नियोजनासाठी आमदार महेश बालदी यांच्या उपस्थितीत बैठक घेण्यात आली. या वेळी कार्यक्रम कसा असेल त्यात आपल्या कार्यकर्त्यांनी कुठे, कधी यायचे त्याबद्दल माहिती देण्यात आली.




या वेळी रायगड जिल्हा अध्यक्ष अविनाश कोळी, उरण तालुका अध्यक्ष रवी भोईर, तालुका महिला अध्यक्ष राणी म्हात्रे, चिटणीस निर्मला घरत, जिल्हा उपाध्यक्ष संगीता पाटील, उरण शहर अध्यक्ष कौशिक शाह, माजी जि. प. सदस्य विजय भोईर, तालुका सरचिटणीस सुनील पाटील, जिल्हा चिटणीस चंद्रकांत घरत, कामगार नेते सुधीर घरत, उरण पूर्व विभाग अध्यक्ष शशी पाटील, जासई विभाग अध्यक्ष गोपी म्हात्रे, धनाजी ठाकूर, महालन अध्यक्ष महेश कडू, जिल्हा उपाध्यक्ष नीलकंठ घरत, उरण शहर युवा अध्यक्ष निलेश पाटील, शहर महिला अध्यक्ष संपूर्णा थळी, मनोहर सहतीया, हितेश शाह, मनन पटेल, अजित भिंडे, मनोहर सहतीया, माजी नगरसेवक राजेश ठाकूर, राजेश कोळी, जसिम गॅस, उरण तालुका उपाध्यक्ष मुकुंद गावंड, जयवीन कोळी, मदन कोळी, जिल्ह्याचे व तालुक्याचे पदधिकारी नगरसेवक, शहर कमिटी, युवा कमिटी, महिला कमिटी, गाव गावचे सरपंच, उपसरपंच, जि. प. सदस्य, पं. स. सदस्य, ग्रामपंचायत सदस्य, विभागीय अध्यक्ष, गाव अध्यक्ष, वॉरियर्स प्रमुख, बूथ अध्यक्ष, शक्ती केंद्र प्रमुख आदी उपस्थित होते.

या वेळी उरण तालुका महिला मोर्चा कार्यकारिणी सदस्याची नियुक्ती करून नियुक्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. शेकडो तरुणांनी आमदार महेश बालदी यांच्या कार्यप्रणालीवर विश्वास ठेवून भाजपमध्ये प्रवेश घेतला.

# पत्रकार दिनी पत्रकारांचा सन्मान



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पत्रकार दिनाचे औचित्य साधून पत्रकार उत्कर्ष समितीने मुंबई, ठाणे नवी मुंबई, पनवेल, उरण, पेण, कर्जत, खालापूर पत्रकारिता क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या पत्रकारांना दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर पुरस्कार देऊन सन्मानित केले. कार्यक्रम शनिवारी (दि. ६) ज्येष्ठ नागरिक हॉल पनवेलमधील निलाताई पटवर्धन सभागृह येथे झाला.

पत्रकार सन्मान सोहळ्याचे उद्घाटन स्वामी समर्थ परमपूज्य श्री रामदासजी महाराज यांनी केले. या पत्रकार सन्मान सोहळ्याला स्वामी समर्थ रामदासमहाराज, जितेंद्र तिवारी, एस.सी. मिश्रा आदी उपस्थित होते.

कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी पत्रकार उत्कर्ष समितीचे अध्यक्ष डॉ. अशोक म्हात्रे, प्रदेश सचिव वैभव पाटील, खजिनदार शैलेश ठाकूर, सहसचिव ज्ञानेश्वर कोळी, अशोक घरत, अलंकार भोईर यांनी विशेष मेहनत घेतली. या वेळी उत्कर्ष समितीकडून विद्यार्थी गुणगौरव, महिलांचा सन्मान, वृक्षारोपण, रक्तदान आदी वर्षभर करीत असलेल्या कार्याची माहिती देण्यात आली.

कार्यक्रमात मल्हार चॅनेलचे संपादक नितीन कोळी, 'सागर'चे पत्रकार विजय मोकल, सा. रसायनी टाईम्सचे संपादक अनिल भोळे, सा. झुंजार मतचे संपादक अजित पाटील, ज्येष्ठ पत्रकार मंदार दोंदे, पत्रकार मिलिंद खारपाटील, लालचंद यादव, महामुंबई चॅनेलच्या तृप्ती भोईर यांच्यासह इतर काही पत्रकारांना मान्यवरांच्या हस्ते दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.



**पनवेल : न्हावाशेवा-शिवडी अटल सेतूचे लोकार्पण १२ जानेवारी रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते होणार आहे. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी भाजप तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या उपस्थितीत गावोगावी बैठका घेऊन नियोजन करण्यात येत आहे. या वेळी तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, सरचिटणीस राजेंद्र पाटील, अनुसूचित जाती मोर्चा जिल्हाध्यक्ष अमित जाधव, भाजप नेते प्रल्हाद केणी, माजी पं.स. सदस्य भूपेंद्र पाटील आदींसह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. दरम्यान, मयुर कदम यांची पनवेल शहर प्रकोष्ठपदी नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचे भाजप तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.**




# नेरूळमध्ये रंगणार आगरी-कोळी महोत्सव

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

अखिल आगरी कोळी समाज प्रबोधन ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष जेष्ठ माजी नगरसेवक नामदेव भगत यांच्या माध्यमातून नेरूळ सेक्टर १२ सारसोळ बस डेपोच्या मागे असणाऱ्या श्री गणेश रामलीला मैदानावर १० ते २१ जानेवारी २०२४ दरम्यान सायंकाळी ६ ते १० वाजता या वेळेत भव्य आगरी-कोळी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

विविध समाज प्रबोधनात्मक कार्यक्रमांबरोबरच आगरी-कोळी समाजाच्या ग्रामसंस्कृतीचा आकर्षक देखावा, संस्कृतीदर्शक चित्र प्रदर्शन, खाद्य संस्कृती, सुक्या मासळीचा बाजार, भव्य फनफेअर हे या महोत्सवाचे खास आकर्षण ठरणार आह. सलग बारा दिवस असणाऱ्या या महोत्सवाचा शुभारंभ १० जानेवारी रोजी सायंकाळी श्री गणेश प्रासादिक भजन मंडळाचे सुप्रसिद्ध बुवा रामदास पाटील, संतोष पाटील आणि अमृत पाटील यांच्या सुश्राव्य भजनाने होणार आहे.




एन आर बी डान्स अकादमी यांचा सांस्कृतिक कार्यक्रम, दुसर्या दिवशी रंग महाराष्ट्राचे, जय हनुमान कलामंच, प पूज्य माताजी निर्मला देवी प्रणित योगा ध्यान व भजन संध्या, नवी मुंबईचा नाखवा, रंग संक्रांतीचे, नाखवा माझा दर्जाचा राजा, लोक गीत गायन, महाराष्ट्रातील सुवर्ण यात्रा, लावण्य दरबार, कला सागर जल्लोष, आणि शेवटच्या दिवशी दर्या सारंगा आदी सांस्कृतिक आणि समाज प्रबोधन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असल्याचे अध्यक्ष नामदेव भगत यांनी सांगितले.

नवी मुंबई येथील ग्रामसंस्कृती, लोककला व लोकपरंपरेचे जतन व्हावे, नवोदित कलावंतांना हक्काचे व्यासपीठ मिळवून देतानाच जुन्या जाणत्या कलावंतांचा गुणगौरव व्हावा, ग्रामसंस्कृती आणि नागर संस्कृती यांच्यामध्ये वैचारिक आदान-प्रदान व्हावे, सांप्रदायिक एकता व एकात्मता वृद्धिंगत व्हावी, हाच उद्देश समोर ठेवून या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवात विविध राजकीय तसेच सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती लाभणार आहे.

हा महोत्सव हा निशुल्क असल्याने नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन संस्थेचे संस्थापक अध्यक्ष ज्येष्ठ माजी नगरसेवक नामदेव भगत यांनी केले आहे.

# 'विद्याभवन'चे संचालक व शिक्षक आदर्श पुरस्काराने सन्मानित

**नवी मुंबई : बातमीदार, प्रतिनिधी**

पुणे विद्यार्थीगृहाचे नवनिर्वाचित कुलसचिव आणि नेरूळ येथील विद्याभवन शिक्षण संकुलाचे संचालक दिनेश मिसाळ यांना आदर्श संस्था संचालक तसेच माध्यमिक मराठी विभागाचे गणित शिक्षक दत्तात्रय आटपाडकर यांना आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

महाराष्ट्र राज्य शिवछत्रपती शिक्षक संघटनेकडून राज्यस्तरीय गुणवंत पुरस्कार सोहळा अंबरनाथ येथे आयोजित करण्यात आला. दिनेश मिसाळ यांनी आपल्या उत्कृष्ट कर्तृत्वशैलीने उत्तम कार्य करून शिक्षण संस्थेच्या सर्वांगीण प्रगतीत बहुमोल असे योगदान दिले. त्यांच्या या अद्वितीय कार्यासाठी त्यांना शिक्षक आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे आणि शिक्षणाधिकारी ललिता दहितुले यांच्या हस्ते आदर्श संस्था संचालक पुरस्काराने गौरविण्यात आले. दिनेश मिसाळ यांच्या वतीने हा पुरस्कार मुख्याध्यापिका सुवर्णा मिसाळ, शिक्षिका नूतन गवांदे, जगन्नाथ कोळी आणि अविनाश कुलकर्णी यांनी हा पुरस्कार स्वीकारला.



नेरूळ येथील विद्याभवन शिक्षण संकुलातील माध्यमिक मराठी विभागाचे गणित व विज्ञान शिक्षक दत्तात्रय आटपाडकर यांना देखील अध्यापनाच्या उत्कृष्ट कार्यासाठी आदर्श शिक्षक पुरस्काराने गौरविण्यात आले.

पुणे विद्यार्थीगृह संस्थेचे पदाधिकारी विद्यार्थी आणि पालकांनी त्यांचे अभिनंदन केले.

# चिरनेरच्या श्रीराम मंदिरात आयुर्वेदिक शिबिर उत्साहात



**उरण : प्रतिनिधी, वार्ताहर**

फिलान हर्बो मेडिक्स प्राव्हेट लिमिटेडच्या वतीने चिरनेर येथे आयुर्वेदिक आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. डॉ. नजम अली कादरी यांच्या मार्गदर्शनाखाली रुग्णांची तपासणी करण्यात येत होती. शिबिरात नाडी परीक्षणाद्वारे आजारांचे निदान करण्यात आले. चिरनेर गावातील श्रीराम मंदिराच्या सभा मंडपात या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

या शिबिरास परिसरातील नागरिक, अबाल वृद्ध, शाळा कॉलेजचे विद्यार्थी या सर्वांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत, आरोग्य तपासणी करून घेतली. विशेषता या आयुर्वेदिक शिबिरात थायरॉईड, मुतखडा, मुळव्याध, मधुमेह, कावीळ, दमा, सर्दी, खोकला, सांधेदुखी, गुडघे दुखी, वातरोग, चर्मरोग, पोट वाढणे, स्त्रियांचे आजार, शोचास साफ न होणे, भूक न लागणे, अपचन, केस गळणे, डोकेदुखी, दंत विकार, अल्सर, गॅस, पित्त, जळजळ, अशक्तपणा, वजन वाढविणे, वजन कमी होणे आदी रोगांची तपासणी करण्यात आली.

शिबिराचे उद्घाटन चिरनेर ग्रामपंचायतीचे माजी सदस्य रमेश फोफेरकर यांच्या हस्ते करण्यात आले. शिबिराचे मार्गदर्शक किशोर भगत, आशावर्कर प्रगती भगत, डॉ. नजम अली कादरी, माजी सरपंच अविनाश म्हात्रे ग्रामपंचायतीचे सदस्य समीर डुंगीकर आदी जण उपस्थित होते.

# तुपगावात संत काशीबा महाराजांची पुण्यतिथी

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

तुपगाव येथील गुरव समाज हॉलमध्ये संत काशीबा महाराजांची पुण्यतिथी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या वेळी सरपंच रवींद्र कुंभार यांच्या हस्ते दिपप्रज्वलन करून संत काशीबा महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

या वेळी तुपगावचे गुरव समाजाचे अध्यक्ष राहुल गुरव, अखिल गुरव समाज संघटनेचे महाराष्ट्र राज्याचे मुख्य सरचिटणीस विजय ठोसर, अमोल गुरव, अखिल गुरव समाज संघटना रायगडचे अध्यक्ष रायगड ठाणे मुंबई संस्थेचे उपाध्यक्ष, योगेश गुरव अखेर समाज संघटना रायगडचे कार्याध्यक्ष, दिलीप गुरव, गजानन गुरव, महेश गुरव, अशोक प्रधान, कृष्णा गुरव आदीसह मोठ्या संख्येने गुरव बांधव उपस्थित होते.



# शेखर जगताप यांच्या प्रकल्पाला प्रथम क्रमांक

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

शालेय शिक्षण व कीडा विभाग महाराष्ट्र शासन, प्रादेशिक विद्या प्राधिकरण (राज्य विज्ञान संस्था) नागपूर आणि शिक्षण विभाग (माध्यमिक) जिल्हा परिषद ठाणे आयोजित ५१वे जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. या प्रदर्शनात ठाणे जिल्ह्यातील तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनातून निवडण्यात आलेल्या निवडक वैज्ञानिक प्रतिकृती आणि शैक्षणिक साहित्याचे सादरीकरण करण्यात आले.



माध्यमिक शिक्षक शैक्षणिक साहित्य निर्मिती मध्ये कामोठे येथील रहिवासी आणि एनआरबी एज्युकेशनल, सोशल अँड कल्चरल ट्रस्ट संचालित शिक्षण प्रसारक विद्यालय, नेरूळ, नवी मुंबई या विद्यालयातील विज्ञान शिक्षक शेखर शांताराम जगताप यांच्या इलेक्ट्रोमॅग्नेटिझम अँड ऑप्टिक्स या विषयावरील प्रकल्पा ला प्रथम क्रमांक मिळाला आणि या प्रकल्पाची राज्यस्तरीय प्रदर्शनासाठी निवड करण्यात आली. एन आर बी एज्युकेशनल, सोशल ॲण्ड कल्चरल ट्रस्ट चे संस्थापक अध्यक्ष श्री नामदेव रामा भगत यांनी श्री शेखर जगताप यांचे मिळवलेल्या यशाबद्दल कौतुक करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

या वेळी माध्यमिक विभागाच्या मुख्याध्यापिका प्राजक्ता कांचन कोठेकर, प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका वंदना पाटील, भाऊसाहेब आव्हाड, पूर्वा ठाकरे, सुगंधा घुले, निराशा मोकल, सुनीता विर, विद्या पाटील, मनीषा गावंड, सरस्वती मासये आदी उपस्थित होते.

## निवडक

### पत्रकार दिनानिमित्त औषध, फळवाटप



**माणगाव** : तालुका पत्रकार संघातर्फे पत्रकार दिनानिमित्त उपजिल्हा रुग्णालयात औषध व फळवाटप करण्यात आले. औषध वाटप राजिपचे माजी शिक्षण व आरोग्य समिती सभापती ॲड. राजीव साबळे, नगराध्यक्ष ज्ञानदेव पवार यांच्या हस्ते तर फळवाटप भालचंद्र खाडे, उद्योजक खेमचंद मेथा, सुभाष दळवी, माणगाव नागरी सेवा फाउंडेशनचे अध्यक्ष संजय गांधी यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी पत्रकार संघाचे अध्यक्ष सलीम शेख, पं. स. माजी सभापती संगीता बक्कम, शिक्षिका विनया जाधव, माजी नगराध्यक्ष योगिता चव्हाण, उपजिल्हा रुग्णालयाचे प्रभारी वैद्यकीय अधीक्षक डॉ. सचिन गोमसाले, डॉ. दिपक देशमुख, राष्ट्रवादीचे उपाध्यक्ष नामदेव कासारे, युवा नेते विरेश येरुणकर, प्रा. हर्षल जोशी, किशोरी हिरवे, एकता ग्रामीण क्रिकेट असोसिएशनचे संस्थापक राहुल दसवते, युवा नेते उमेश यादव आदी उपस्थित होते.

### आपत्ती व्यवस्थापन दिनदर्शिकचे प्रकाशन

**अलिबाग** : नैसर्गिक आपत्ती, शेतकऱ्यांची सुरक्षा, पाणी, वीज, अग्नी, विद्यार्थी, देशाची सुरक्षा, योगाभ्यास, वने जगवा आणि अपघात समयसुचकतेसह महत्त्वाचे दूरध्वनीची परिपूर्ण माहिती असणारे रायगडचा युवक फाउंडेशन आपत्ती व्यवस्थापन २०२४ दिनदर्शिकचे अलिबागचे विभागीय पोलीस अधिकारी अरुण भोर यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. या वेळी रायगडचा युवक फाउंडेशनचे अध्यक्ष तसेच आपत्ती तज्ज्ञ डॉ. जयपाल पाटील, वकील वैभव भोळे, प्रा. जोगळेकर, सुभाष म्हात्रे आदी उपस्थित होते.




# रोहा शहरात वाहतूक कोंडी जटील

## पडम व अष्टमी रेल्वे फाटक ठरतेय प्रवाशांना डोकेदुखी

**रोहे : महादेव सरसंबे**

अस्ताव्यस्त गाड्या पार्किंग, अरुंद रस्ते, ठिकठिकाणी ट्रान्सपोर्टच्या गाड्या यामुळे रोहा शहरात वाहतूक कोंडीची समस्या जटील बनली आहे. दुसरीकडे पडम व अष्टमी रेल्वेफाटक सातत्याने पडत असल्याने प्रवाशांना फाटक उघडेपर्यंत ताटकळत बसवे लागत आहे. याचा फटका सर्वात जास्त विद्यार्थी व कामगारांना बसत आहे.



रोहा शहरात बाजारहाटासाठी आलेले अथवा कामानिमित्ताने आलेले नागरिक आपली वाहने रस्त्याच्या दुतर्फा लावत असल्याने वाहतूक कोंडी होत आहे. यातच फळविक्रेत्यांच्या गाड्या रस्त्यावर लागत आहेत, तर दुसरीकडे बाजारहाटासाठी आलेल्या गाड्या, पर्यटकांच्या गाड्या व अन्य गाड्या रस्त्याच्या दोन्ही बाजूंनी उभ्या असल्याने सातत्याने वाहतूक कोंडी होत आहे. शहरातील तीनबत्ती नाका ते हनुमान मंदिरपर्यंतचा रस्ता अरुंद आहे. दुकानात खरेदीसाठी आलेले नागरिक आपली वाहने रस्त्यावर उभी करीत असतात. मुरूडकडे जाणारे पर्यटक याच मार्गाने जात असल्याने सातत्याने या मार्गावर वर्दळ सुरू असते. आधीच अरुंद रस्ता त्यात वाढलेली रहदारी यामुळे वाहतूक कोंडी सातत्याने होत आहे.

मुख्य बाजारपेठेनंतर वीर सावरकर रोड, नगरपालिका ते राममारुती चौक हा वर्दळीचा रस्ता आहे. या मार्गावरून शालेय बस, कंपनीच्या बसेस यामुळे वाहनचालकांना कसरत करावी लागत आहे. अनेक वेळा दुकानदारांनी मागवलेले माल ज्या ट्रान्सपोर्ट गाडीतून येतो ती गाडी अनेकदा दुकानाजवळच रस्त्याच्या कडेला उभी करण्यात येते. यामुळे अन्य वाहनचालकांना मात्र त्रास सहन करावा लागतो.

> **पडम व अष्टमी रेल्वेफाटकामुळे कामगार, विद्यार्थी व नागरिकांना त्रास होत आहे. अष्टमी रेल्वेफाटकाला पर्याय म्हणून बांधण्यात येत असलेल्या उड्डाणपूल लवकरात लवकर करावा तर दुसरीकडे या अष्टमी रेल्वेफाटकाच्या बाजूला दुचाकीसाठी असलेला मार्ग मोकळा करावा, अशी मागणी आमची आहे. यासंबंधी निवेदन तहसिलदारांना देण्यात आले आहे.**
>
> **–नवनीत डोलकर, कोळी समाज नेते**

पर्यटक, कामगार व विद्यार्थ्यांना नेहमीच त्रासदायक ठरणारा मार्ग म्हणजे अष्टमी ते पडम होय. या मार्गावर अष्टमी व पडम येथे रेल्वेफाटक आहे. तालुक्यातून मुंबईकडे व कोकणाकडे जाणारा महत्त्वाचा रेल्वेमार्ग आहे. या मार्गावर सातत्याने रेल्वे ये-जा करीत असतात. त्यामुळे रेल्वे यायच्या वेळेवर रस्त्याच्या दोन्ही बाजूचे बंद करण्यात येते. हे फाटक उघडण्यासाठी किमान १५-२० मिनिटे लागत असल्याने सातत्याने या मार्गावर वाहतूक कोंडी होत आहे. मालगाडी आली, तर जास्त वेळ ताटकळत रहावे लागते. या वाहतूक कोंडीला पर्याय म्हणून राज्य सरकार व केंद्र सरकारच्या माध्यमातून उड्डाणपूल बनवण्यात येत आहे, परंतु गेली तीन वर्षे या उड्डाणपुलाचे काम धिम्या गतीने चालू आहे.

# मुरूड शहरात बिबट्याचा संचार; दुकानाच्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद

**मुरूड : प्रतिनिधी**

तालुक्यातील फणसाड अभयारण्यात बिबट्यांची संख्या वाढली असून आजूबाजूच्या जंगल भागात काहींना बिबट्याचे दर्शन झाले आहे. त्याचप्रकारे मुरूड शहरातसुद्धा बिबट्या आल्याचे सीसीटीव्ही कॅमेऱ्यामधून स्पष्ट दिसत आहे.



शहरातील बाजारपेठेत शुक्रवारी (दि. ५) सकाळी ४.३० वाजण्याच्या दरम्यान बिबट्या मुक्त संचार करीत असताना जाहिद फकजी यांच्या दुकानातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाले आहे. वनविभागाला याबाबत माहिती दिल्यानंतर अधिकाऱ्यांनी या भागाला भेट देऊन पाहणीसुद्धा केली आहे.

या संदर्भात प्रादेशिक विभागाच्या वनपरिक्षेत्र अधिकारी प्रियांका पाटील यांनी सांगितले की, आम्हाला या संदर्भात माहिती मिळाली असून कॅमेरात नक्की बिबट्या आहे का याची तपासणी करीत आहोत. पोलीस ठाण्यात सीसीटीव्ही कॅमेऱ्याचे सर्व फुटेज तपासण्याचे काम ही सुरू आहे. अधिकारीही आजूबाजूच्या परिसराची पाहणी करीत आहेत. नागरिकांना बिबट्या दिसल्यास वनभिगाशी संपर्क करा, असे आवाहन त्यांनी केले.

दुकानदार आसोशिएशनचे अध्यक्ष जाहिद फकजी म्हणाले की, आज दोन अधिकाऱ्यांना पाहणी करतेवेळी बिबट्याच्या पाऊलखुणा असल्याचे निर्दशानास आले आहे. शहरात रोज मॉर्निंग वॉकला नागरिक निघत असतात. अशा वेळी जर बिबट्याने हल्ला केला तर मोठा अनर्थ होऊ शकतो. वनविभागाने तातडीने स्पेशल टीमला प्रचारण करून बिबट्याला शोधून जेरबंद करावे.

# माणगावात तरुणाची गळफास घेऊन आत्महत्या

**माणगाव : प्रतिनिधी**

तालुक्यातील नाणोरे गावच्या हद्दीत हॉटेल साईलीलाजवळ असलेल्या एका वडाच्या झाडावर ३२ वर्षीय तरुणाने अज्ञात कारणास्तव गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना शनिवारी (दि. ६) सायंकाळी ४ वाजण्याच्या सुमारास घडली. याबाबतची माहिती नाणोरे गावचे पोलीस पाटील भारत नथुराम पाटोळे (वय ४२, रा. नाणोरे) यांनी माणगाव पोलीस ठाण्यात दिली.



माणगाव पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार प्रफुल बर्नट टोप्पो (वय ३२, रा. झारखंड) याने कोणत्यातरी अज्ञात कारणास्तव वडाच्या झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केली.

या घटनेची नोंद माणगाव पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूप्रमाणे दाखल करण्यात आली आहे. या घटनेचा अधिक तपास पोलीस निरीक्षक राजेंद्र पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक डी. डी. आघाव हे करीत आहेत.

# हिराकोट तलावात मासे मृत होत असल्याने चिंता

## मत्स्यव्यवसाय विभागाने केली पाहणी; मुख्याधिकाऱ्यांना पत्र

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

शहरातील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर असणाऱ्या हिराकोट तलावातील मासे मृत आढळल्याने मत्स्यविभागाने याबाबत तातडीने पाहणी केली. माशांना बाहेरून देण्यात येणारे खाद्य पूर्णपणे थांबविण्यात यावे, अशा सूचना मस्त्यविभागाने अलिबाग नगरपालिका प्रशासनाला केल्या आहेत.



मत्स्यव्यवसाय विभागाचे जिल्हा उपायुक्त संजय पाटील यांनी अलिबाग नगर परिषदेच्या मुख्याधिकारी यांना याबाबतचे पत्र दिले आहे. मत्स्यव्यवसाय विभागाचे परवाना अधिकाऱ्यांनी हिराकोट तलावाची पाहणी करीत तळ्यातील पाण्याचे विविध गुणधर्म तपासण्यात आले, तसेच मेलेल्या तिलापिया माशांचे नमुने घेण्यात आले. पाण्याचा रंग हा हिरवा झालेला असून पाण्यामध्ये वनस्पतीचे प्रमाण मोठ्या प्रमाणामध्ये वाढल्याने पाण्यातील प्राणवायूचे प्रमाण कमी झाले आहे.

मृत तिलापिया माशांना आजार झाल्याचे दिसून आले आहे, तसेच माशांच्या कल्ल्यांचे निरीक्षण केले असता पाण्यामध्ये कमी प्रमाणामध्ये विरघळलेला प्राणवायू असल्याचे जाणवत आहे, अशा परिस्थितीत पाण्यामध्ये असलेलाा मत्स्यसाठा ५० टक्के कमी करणे आवश्यक आहे. जेणेकरून सद्यस्थितीत पाण्यात असलेला प्राणवायू उर्वरीत माशांना पुरेसा ठरून माशांचे मृत्यू होण्याचे प्रमाण थांबेल, असा दावाही या पत्रातून करण्यात आला आहे.

मृत मासे तत्काळ काढून टाकण्यासाठी आवश्यक त्या मनुष्यबळाची तरतूद करावी जेणेकरून त्यांच्या कुजण्याच्या क्रियेमुळे तलावातील पाणी दर्जाहीन होणार नाही व इतर माशांना होणारा संसर्ग कमी करता येईल, असे त्यांनी सांगितले.

# विज्ञान प्रदर्शनात 'अभिनव'ची बाजी

**माणगाव : प्रतिनिधी**

२१वे तळा तालुका विज्ञान प्रदर्शन गो. म. वेदक विद्यालय तळा येथे ऑनलाईन प्रतिकृती व वक्तृत्व स्पर्धा, प्रश्नमंजुषा स्पर्धा, निबंध स्पर्धा झाल्या. या स्पर्धेत अभिनव ज्ञान मंदिर उसर खुर्द शाळा अव्वल ठरली आहे. प्रशालेने एकूण पाच बक्षिसे मिळवली.



यामध्ये विज्ञान प्रतिकृती उच्च प्राथमिक गटात द्वितीय क्रमांक रिया अशोक शिंदे, प्रश्नमंजुषा माध्यमिक व उच्च माध्यमिक गटात द्वितीय क्रमांक रुची संतोष गुजर, प्रयोगशाळा परिचर शैक्षणिक निर्मिती प्रथम क्रमांक संतोष बळीराम घाग, माध्यमिक शिक्षक शैक्षणिक साहित्य निर्मिती प्रथम क्रमांक राजेंद्र चंद्रकांत भगत यांनी प्राप्त केला. बक्षीस वितरण कार्यक्रमाला तळा विभाग शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव देशमुख, गटशिक्षणाधिकारी तांबट, विस्ताराधिकारी ठाकूर तसेच प्रतिकृतींचे परीक्षण विद्याधर जोशी, बिराडी बोरली ज्युनिअर कॉलेज श्रीवर्धन यांनी केले. विद्यार्थी, शिक्षक व प्रयोगशाळा परिचारकांचे संस्था पदाधिकारी व शैक्षणिक क्षेत्रातून अभिनंदन केले जात आहे.



**नागोठणे : भाजपचे रोहा तालुका सरचिटणीस आनंद लाड यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देताना रोहा तालुका माजी सरचिटणीस शामकांत नेरपगार, ज्येष्ठ कार्यकर्ते विवेक रावकर, महेंद्र माने व निलेश घावटे आदी उपस्थित होते.**

# महाड पत्रकार संघातर्फे वाचन जनजागृती अभियान

**महाड : प्रतिनिधी**

पत्रकार दिनी महाड पत्रकार संघाने तालुक्यात वाचन जनजागृती अभियान सुरू केले आहे. तालुक्यातील कोंझर येथील जिजामाता माध्यमिक विद्यालयापासून या अभियानाची सुरुवात शनिवारी (दि.६) झाली.

डिजिटल युगात प्रत्येक जण वाचनापासून दूर होत जात आहेत. यामुळे वाचन चळवळ राबवण्याचा निर्णय महाड पत्रकार संघाने घेतला असून ६ जानेवारीपासून या उपक्रमास प्रारंभ झाला आहे.



तालुक्यातील कोंझर या गावातील जिजामाता माध्यमिक विद्यालयात या उपक्रमाची सुरुवात झाली. या वेळी उपस्थित विद्यार्थ्यांनी आणि पत्रकारांनी गावातून वाचनविषयक घोषणा देत रॅली काढली. महाड पत्रकार संघाचे अध्यक्ष निलेश पवार, उपाध्यक्ष महेश शिंदे, सरपंच विजय कदम, मुख्याध्यापक नामदेव डीगे, ग्रामपंचायत सदस्य अविनाश चव्हाण, ज्येष्ठ पत्रकार चंद्रकांत कोकने, गोपाळ कांबळे, सचिव रोहित पाटील आदी उपस्थित होते. आपल्या भाषणात महेश शिंदे यांनी, आज आपण सर्वजण डिजिटल माध्यमांचा उपयोग करीत आहोत. या डिजिटल माध्यमांचा वापर करताना जे चांगले आहे ते स्वीकारा असे सांगितले, तर कृषी क्षेत्रात वावरताना निसर्गातील अनेक गोष्टी आपल्याला काहीतरी देत असतात. अनेक वनस्पती आपल्याला औषध म्हणून उपयोगात येतात, असे राजेंद्र जैतपाल यांनी सांगितले. विद्यार्थ्यांनी अवांतर वाचन केले पाहिजे कारण यातून आपल्या बुद्धीला चालना मिळेल, असे रघुनाथ भागवत यांनी सांगून देशातील ज्यांचे आपण आदर्श डोळ्यासमोर ठेवतो त्या सगळ्यांनी वाचन केले आहे, असेही सांगितले. वाचन संस्कार जपले पाहिजेत कारण वाचनातून आपल्याला ज्ञान प्राप्त होते असे अध्यक्ष निलेश पवार यांनी सांगून भावी पिढीने वाचनावर भर दिला, तर स्पर्धा परीक्षेला सामोरे जाणे सोपे जाईल, असेही सांगितले.

या वेळी चंद्रकांत कोकने, मुख्याध्यापक नामदेव डीगे, विजय कदम यांनी देखील आपले मनोगत व्यक्त केले. सर्व विद्यार्थ्यांना वर्तमानपत्र भेट देण्यात आले.

# एम. बी. मोरे महाविद्यालयात 'कलातरंग'

**रोहे : प्रतिनिधी**

एम. बी. मोरे फाउंडेशनचे इंग्लिश मिडीयम स्कूल, कनिष्ठ महाविद्यालय व महिला महाविद्यालयात विद्यार्थ्यांचा बहरदार नृत्य कलाविष्कार कलातरंग रंगला. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी बहरदार नृत्य सादर केले. वार्षिक स्नेहसंमेलन कलातरंगचे उद्घाटन आमदार अनिकेत तटकरे यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी एम. बी. मोरे फाउंडेशन अध्यक्ष विजयराव मोरे, सरपंच सुवर्णा रटाटे, उपाध्यक्ष अशोकराव मोरे, संचालक बापु लिंबोरे, रवींद्र भोसले, प्रकाश जैन, सतिष भगत, मंगेश देवकर, रुपेश बामुगडे, घनश्याम कराळे, कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य प्रसन्न म्हसाळकर, मुख्याध्यापिक नंदिनी जोशी उपस्थित होते.






या वेळी आमदार अनिकेत तटकरे यांनी, कलातरंगच्या निमित्ताने शालेय जीवनाची आठवण येत आहे. पुस्तकी ज्ञानाबरोबर मुलांना विविध कार्यक्रमातून व्यासपीठ निर्माण करण्याचे काम शाळा, महाविद्यालयातून केले जात आहे. पुढच्या वर्षी या महाविद्यालयाची सुसज्ज वास्तू उभी राहिल, असे आश्वासन दिले. प्राचार्य प्रसन्न म्हसाळकर यांनी, शैक्षणिक जीवनात वार्षिक स्नेहसंमेलन म्हणजे विद्यार्थ्यांना तणावमुक्त होत मौजमस्ती करता येते, असे सांगितले.

नंदिनी जोशी यांनी, या वार्षिक कार्यक्रमातून व्यक्तीमत्व विकास घडतो. त्याचबरोबर मुलांमध्ये आत्मविश्वास निर्माण होत असल्याचे यांनी सांगितले.

# चेतेश्वर पुजाराचे शानदार द्विशतक

## रणजी चषक स्पर्धेत कामगिरी; विजय हजारेंना टाकले मागे

**राजकोट : वृत्तसंस्था**

दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या कसोटी मालिकेत भारतीय संघामध्ये स्थान न मिळालेला चेतेश्वर पुजारा याने रणजी चषक स्पर्धेत द्विशतक झळकावून पुनरागमनाचे संकेत दिले आहेत. त्याने विजय हजारे यांचा विक्रम मोडला. विशेष म्हणजे त्याची ही मोठी खेळी अशा वेळी आली आहे, जेव्हा भारतीय निवड समितीला इंग्लंडविरुद्धच्या कसोटी मालिकेसाठी टीम इंडियाची घोषणा करायची आहे.

राजकोट येथील सौराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या मैदानावर खेळल्या जात असलेल्या या सामन्यात पुजाराने हा पराक्रम केला आहे. झारखंडविरुद्धच्या या सामन्यात सौराष्ट्राचा कर्णधार जयदेव उनाडकटने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. पहिल्याच दिवशी सौराष्ट्रच्या गोलंदाजांनी झारखंडला १४२ धावांत गुंडाळले. यानंतर सौराष्ट्रने सुरुवातीपासूनच दमदार फलंदाजी केली. हार्विक देसाई (८५), शेल्डन जॅक्सन (५४) आणि अर्पित वसावडा (६८) यांनी अर्धशतके झळकावली. त्यानंतर सौराष्ट्राने आपला पहिला डाव १५८ षटकानंतर ४ बाद ५७८ धावसंख्येवर घोषित केला आणि पहिल्या डावाच्या जोरावर ४२० धावांची आघाडी घेतली.

सौराष्ट्राने आपला पहिला डाव घोषित केला, तेव्हा प्रेरक मंकडने आणि चेतेश्वर पुजार खेळपट्टीवर नाबाद होते. प्रेरकही शतक झळकावले. त्याने १७६ चेंडूंचा सामना करताना १२ चौकारांच्या मदतीने नाबाद १०४ धावा केल्या. त्याचबरोबर पुजाराने ३५६ चेंडूंचा सामना करताना ३० चौकारांच्या मदतीने नाबाद २४३ धावा केल्या. त्याने या शतकाच्या जोरावर विजय हजारे यांचा प्रथम श्रेणी क्रिकेटमधील विक्रम मोडला.

पुजारा गेल्या काही काळ फॉर्ममध्ये नाही. त्यामुळे त्याला भारताच्या संघातून वगळण्यात आले आहे. तो सध्या देशांतर्गत स्पर्धा रणजी चषकमध्ये खेळत असून द्विशतक झळकावून त्याने सर्वांचे लक्ष्य वेधले आहे.




# अफगाणिस्तानविरुद्धच्या टी-२० मालिकेसाठी भारतीय संघ जाहीर

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आगामी टी-२० वर्ल्डकपसाठी आता टीम इंडिया जोरदार तयारीला लागली आहे. येत्या ११ जानेवारीपासून भारत आणि अफगाणिस्तान यांच्यात टी-२० मालिका खेळवली जाईल. तीन सामन्यांच्या मालिकेसाठी टीम इंडियाची घोषणा झाली आहे. रोहित शर्माच्या खांद्यावर पुन्हा एकदा संघाची जबाबदारी देण्यात आली आहे. संजू सॅमसनला संघात संधी मिळाली आहे, तर हार्दिक पांड्या आणि सूर्यकुमार यादवला आराम देण्यात आला आहे.

**रोहित शर्मा कर्णधारपदी**

रोहित शर्माने मागील टी-२० वर्ल्डकपपासून एकही आंतरराष्ट्रीय टी-२० सामना खेळला नाही. त्यामुळे त्याला संधी मिळेल की नाही? अशी चर्चा सुरू होती. अशातच आता रोहित आणि विराट कोहली यांनी जोरदार कमबॅक करीत टी-२० वर्ल्डकपच्या आशा जिंवत ठेवल्या आहेत, तर संजू सॅमसन, शिवम दुबे आणि वॉशिंग्टन सुंदर यांनी संधी दिली गेल्याने अनेकांच्या भुवया उंचवल्या गेल्या आहेत.

सूर्यकुमार यादव आणि हार्दिक पांड्या या दोन्ही खेळाडूंपैकी कोण कॅप्टन होणार? यावर चर्चा सुरू होती, मात्र आता या दोन्ही खेळाडूंना आराम देण्यात आला आहे. त्यामुळे आता रोहितनंतर कोण या प्रश्नावर चर्चा तर होतच राहणार की काय? असा प्रश्नदेखील विचारला जात आहे.

**भारतीय संघ** : रोहित शर्मा (कर्णधार), शुभमन गिल, यशस्वी जयस्वाल, विराट कोहली, टिळक वर्मा, रिंकू सिंग, जितेश शर्मा व संजू सॅमसन (यष्टीरक्षक), शिवम दुबे, वॉशिंग्टन सुंदर, अक्षर पटेल, रवी बिश्नोई, कुलदीप यादव, अर्शदीप सिंग, आवेश खान, मुकेश कुमार.

अफगाणिस्तानचा संघ : इब्राहिम झादरान (कर्णधार), रहमानुल्लाह गुरबाज व इकराम अलीखिल (यष्टीरक्षक), हजरतुल्ला झाझाई, रहमत शाह, नजीबुल्ला झादरान, मोहम्मद नबी, करीम जनात, अजमुल्ला उमरझाई, शराफुद्दीन अश्रफ, मुजीब उर रहमान, फजल हक फारुकी, फरीद अहमद, नवीन उल हक, नूर अहमद, मोहम्मद सलीम, कैस अहमद, गुलबदिन नायब, राशिद खान.

## रणजी ट्रॉफी : महाराष्ट्राची मणिपूरवर एक डाव आणि ६९ धावांनी मात

**सोलापूर : प्रतिनिधी**

रणजी क्रिकेट स्पर्धेत रविवारी (दि.७) सामन्यात तिसऱ्याच दिवशी महाराष्ट्र संघाने मणिपूरवर सकाळच्या सत्रात एक डाव आणि ६९ धावांनी दणदणीत विजय मिळविला. महाराष्ट्राचा अंकित बावणे सामनावीर ठरला.

मणिपूरकडून कालच्या ४ बाद ८५ धावांवरून किशन संघा आणि अजय सिंग यांनी डावाची सुरुवात केली, पण महाराष्ट्राच्या भेदक गोलंदाजीसमोर मणिपूरचा निभाव लागू शकला नाही. सिद्धेश वीरने दिवसाचा पहिला झटका दिला. किशन १६ धावा करून बाद झाला. त्यानंतर एकापाठोपाठ सर्व फलंदाज तंबूत परतत गेले. मणिपूरला ५५.२ षटकांत सर्वबाद ११४ धावा करता आल्या.

महाराष्ट्राकडून सिद्धेशने ५.२ षटक टाकत अवघ्या १० धावा देत मणिपूरचे चार गडी बाद केले. त्याला हितेश वाळुंजने तीन बळी मिळवत साथ दिली. कर्णधार केदार जाधव आणि विकी ओसवाल यांनी प्रत्येकी एक गडी बाद केला.

## धोनीचा हुक्का ओढतानाचा व्हिडीओ व्हायरल

**चेन्नई : वृत्तसंस्था**

महेंद्रसिंह धोनी हा क्रिकेटच्या मैदानावर त्याच्या शानदार खेळीसाठी आणि मैदानाबाहेर साधे जीवन जगण्यासाठी ओळखला जातो, पण आता सोशल मीडियावर एक व्हिडीओ व्हायरल होत आहे, ज्यामध्ये चेन्नई सुपर किंग्जचा (सीएसके) कर्णधार हुक्का ओढताना दिसत आहे. लांब केसांचा लूक असलेल्या सूटमध्ये तो दिसत आहे. या व्हिडीओवर वेगवेगळ्या प्रतिक्रिया आल्या आहेत.

# साने गुरुजी हायस्कूल, एसआयईएस हायस्कूल विजेते

**मुंबई : प्रतिनिधी**

अमर हिंद मंडळाने दादरच्या अमर वाडी, गोखले रोड येथे आंतरशालेय कबड्डी स्पर्धा आयोजित केली होती. या स्पर्धेत मुलांमध्ये साने गुरुजी हायस्कूल, तर मुलींमध्ये एसआयईएस हायस्कूलने बाजी मारत विजेतेपद पटकाविले.

वेस्टर्न रेल्वे सहाय्यक प्रशिक्षक वर्षा भोसले यांच्या हस्ते स्पर्धेचे उदघाटन झाले. या वेळी मंडळाचे खजिनदार प्रफुल्ल पाटील, सदस्य रमेश नाटेकर, निलेश सावंत, रोहन चव्हाण, जतीन टाकळे आदी उपस्थित होते.

या स्पर्धेत कबड्डीचे एकूण २६ शाळांचे संघ सहभागी झाले होते.

मुलांच्या अंतिम सामन्यात कबड्डीमध्ये दादरच्या साने गुरुजी विद्यालयाने (इंग्रजी माध्यम) माटुंग्याच्या गौरीदत्त मित्तल विद्यालयाचा ४६-१५ (मध्यंतर ३७-११) असा धुव्वा उडवत ३१ गुणांनी विजय मिळवत अमरहिंद चषकावर नाव कोरले. या सामन्यात साने गुरुजी हायस्कूलच्या चढाईत समर्थ कासुर्डेने, तर पकड करताना विघ्नेश परबने जोरदार कामगिरी केली व त्याच्याच जोरावर दादरच्या साने गुरुजी विद्यालयाने विजेतेपदावर नाव कोरले. माटुंग्याच्या गौरीदत्त मित्तलच्या चढाईत सुंदरम गुप्ता, तर पकड करताना रणवीर सिंगने केलेली कामगिरी अखेर कमीच पडली.

**आंतरशालेय कबड्डी स्पर्धा**



मुलींचा अंतिम सामना अतिशय चुरशीचा झाला. या सामन्यात माटुंग्याच्या एसआयईएस विद्यालयाने विक्रोळीच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यालयावर ४४-४३ (मध्यंतर २५-१९) असा एक गुणाने अतिशय चुरशीच्या सामन्यात विजय मिळवला. या सामन्यात एसआयईएस विद्यालयाच्या तनुश्री शिंदेने कमालीच्या चढाया करत तर आर्या देवकरने उत्कृष्ट पक्कड करीत संघाला विजय मिळवून दिला, तर पराभूत डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यालयाच्या दृष्टी कुंभारने चढाईत संघाला मजबूत स्थिती मिळवून दिली. सई पवारने चांगल्या पक्कड करीत कडवी लढत दिली, पण शेवटी एसआयईएस विद्यालयाने निसटता विजय मिळवत अमरहिंद चषकावर नाव कोरले.

# अल्टीमेट खो-खो : ओडिशाचा गुजरातवर विजय, तर चेन्नईकडून मुंबई पराभूत

**भुवनेश्वर : वृत्तसंस्था**

अल्टीमेट खो-खोच्या सीझन २मध्ये झालेल्या चुरशीच्या सामन्यात ओडिशा जगरनॉट्सने गुजरात जायंट्सवर तीन गुणांनी विजय मिळवला व उपांत्य फेरीत पोहचणारा तो तिसरा संघ ठरला. यानंतर झालेल्या दुसऱ्या सामन्यात चेन्नई क्विक गन्सने मुंबई खिलाडीसचा २३ गुणांनी धुव्वा उडवला व या संघाला उपांत्य फेरीतून बाहेर फेकत चेन्नई हा उपांत्य फेरीत पोहचणारा चौथा संघ ठरला. कटक येथे झालेल्या या सामन्यांमध्ये सुयश गरगटे व हृषिकेश मुर्चावडेला अष्टपैलू खेळाडूचा पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

ओडिशाने गुजरातचा ३०-२७ (मध्यंतर १९-१४) असा तीन गुणांनी पराभव केला. गुजरातने नाणेफेक जिंकून प्रथम संरक्षण घेतले व ओडिशाला आक्रमणासाठी आमंत्रित केले. सात मिनिटांच्या पहिल्या टर्नमध्ये ओडिशाने पहिल्यांदाच पॉवर प्लेने सुरवात केली. गुजरातच्या पहिल्या तुकडीतील सुयश गरगटेला रोहन शिंगाडेने सहज बाद केले, अभिजित पाटीललासुद्धा रोहनने आकाशीय सूर मारत बाद केले व फैजंखा पठाणला मनोज पाटीलने आकाशीय सूर मारत बाद केले. त्याआधी फैजंखाने ड्रीम रन्सचा एक गुण मिळवला त्यावेळी घड्याळात ३.२० मि. झाली होती. दुसऱ्या तुकडीतील व्ही. सुब्रमणिला दिपेश मोरेने सहज बाद केले. राम मोहनला सुशांत काळधोणेने आकाशीय सूर मारत बाद केले, तर राजवर्धन पाटीलला मनोज कुमारने सहज बाद केले, मात्र त्याआधी राजवर्धननेसुद्धा ड्रीम रन्सचा एक गुण मिळवून दिला व ही तुकडी ६.२७ मिनिटांत बाद झाली, तर तिसऱ्या तुकडीतील भरत कुमारला मनोज पाटीलने स्तंभात बाद केले.



दुसऱ्या टर्नमध्ये ओडिशा जगरनॉट्सच्या पहिल्या तुकडीतील गौतमला सुयश गरगटेने सहज बाद केले, दिलीप खांडवीला बाद केल्याचे अपील केले, मात्र दिलीपने डीएसआर घेतल्याने तो नाबाद ठरला. त्यानंतर दिलीप खांडवीने चार ड्रीम रन्सचे गुण मिळवून दिले. दिलीप (२.३४ मि. संरक्षण) बाद झाला तो संकेत कदमच्या सहज स्पर्शाने, तर विशालला (१.०४ मि. संरक्षण) पी नरसय्याने आकाशीय सूर मारत बाद केले व ही तुकडी ५.१३ मिनिटांनी बाद झाली. दुसऱ्या तुकडीतील अक्षय मासाळला शुभम थोरातने स्तंभात बाद केले व दहा सेकंद असताना मनोज कुमारला शुभमने अंगावर जात सहज स्पर्शाने बाद केले. मध्यंतराला ओडिशाने गुजरातवर १९-१४ अशी पाच गुणांची आघाडी घेतली होती (ओडिशाने दिलेल्या तुकडीतील खेळाडू ऐन वेळी बदलल्याने गुजरातला दोन गुण बहाल केले गेले).

मध्यंतरानंतर तिसऱ्या टर्नमध्ये गुजरातच्या पहिल्या तुकडीतील शुभम थोरातला (२.१५ मि. संरक्षण) दीपक साहूने आकाशीय सूर मारत बाद केले व लगेचच दिपक माधवला दिपेश मोरेने सहज बाद केले. अक्षय भांगरेने मात्र जास्त पडझड न होऊ देता दोन ड्रीम रन्सचे गुण मिळवून दिले व तो अविनाश देसाईकडून बाद झाला व या तुकडीने ३.३९ मि. संरक्षण केले. दुसऱ्या तुकडीतील फैजंखा पठाणला मनोज पाटीलने सहज बाद केले, तर सुयश गरगटे शेवटपर्यंत नाबाद राहिला व त्याने ड्रीम रन्सचा एक गुणसुद्धा मिळवून दिला.

शेवटच्या व चौथ्या टर्नमध्ये ओडिशाने २७-१७ अशी १० गुणांची आघाडी घेत मैदानात उतरली व त्यांची पहिल्या तुकडीतील दिपेश मोरेला भरत कुमारने आकाशीय सूर मारत बाद केले, पाठोपाठ बी. निखीलसुद्धा बाद झाला व ओंकार सोनवणेने ड्रीम रन्सचा एक गुण मिळवून दिला व भरत कुमार कडून स्तंभात बाद केले व या तुकडीने ३.३५ मिनिटे संरक्षण केले. दुसऱ्या तुकडीतील मनोज पाटीलला फैजंखा पठाणने सहज बाद केले. अविनाश देसाईला बाद केल्याचे अपील केले गेले, तर त्याने डीएसआर घेत नाबाद झाला व त्याने त्यानंतर चांगले संरक्षण करीत ओडिशाला चांगल्या स्थितीत आणून ठेवले व त्यानंतर रोहन शिगाडेने नाबाद राहत दोन ड्रीम रन्स मिळवून देत संघाला विजय मिळवून दिला. हा सामना ओडिशाने ३०-२७ असा तीन गुणांनी जिंकला. या सामन्यात मनोज पाटीलला उत्कृष्ट आक्रमक, दिलीप खांडवीला उत्कृष्ट संरक्षक तर सुयश गरगटेला अष्टपैलू खेळाडूचा पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

# ऑस्ट्रेलियाकडून वॉर्नरला विजयी निरोप

## सलग सहाव्या कसोटी मालिकेत पाकिस्तानचा पराभव

**सिडनी : वृत्तसंस्था**

ऑस्ट्रेलियाने तीन कसोटी सामन्यांच्या मालिकेत पाकिस्तानचा पराभव केला आहे. त्यांनी सिडनी कसोटी आठ गडी राखून जिंकून मालिका ३-० अशी जिंकली. यासह ऑस्ट्रेलियातील कसोटी मालिकेदरम्यान पाकिस्तानचा एकही सामना न जिंकता सलग सहाव्यांदा पराभव झाला आहे. 'कांगारू' संघाचा दिग्गज सलामीवीर डेव्हिड वॉर्नरचा हा शेवटचा कसोटी सामना होता. त्याने विजयासह कसोटी क्रिकेटचा निरोप घेतला.

पाकिस्तानचा कर्णधार शान मसूदने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. त्याच्या संघाने पहिल्या डावात ३१३ धावा केल्या होत्या. त्याचवेळी



ऑस्ट्रेलियाने पहिल्या डावात २९९ धावा केल्या होत्या. अशा प्रकारे पाकिस्तानला १४ धावांची आघाडी मिळाली होती, मात्र दुसऱ्या डावात त्यांच्या फलंदाजांनी निराशाजनक कामगिरी केली आणि संपूर्ण संघ ११५ धावांतच गारद झाला. त्यामुळे ऑस्ट्रेलियाला विजयासाठी १३० धावांचे लक्ष्य मिळाले, जे त्यांनी दोन गडी गमावून पूर्ण केले.

ऑस्ट्रेलियाकडून दुसऱ्या डावात मार्नस लाबुशेनने सर्वाधिक नाबाद ६२ धावा केल्या. त्याचवेळी डेव्हिड वॉर्नरने कारकिर्दीतील शेवटच्या डावात ५७ धावांचे योगदान दिले. संघाला विजयासाठी ११ धावांची गरज असताना तो बाद झाला. त्याच्या पाठोपाठ फलंदाजीला आलेल्या स्टीव्ह स्मिथने लाबुशेनसह विजयावर शिक्कामोर्तब केले. स्मिथ चार धावा करून नाबाद राहिला.

या सामन्यात आमिर जमालने पाकिस्तानकडून पहिल्या डावात सहा विकेट घेतल्या होत्या. त्याने फलंदाजीतही चांगली कामगिरी केली. जमालने पहिल्या डावात ८२ आणि दुसऱ्या डावात १८ धावा केल्या होत्या. अशा प्रकारे त्याने सामन्यात एकूण १०० धावा केल्या आणि सहा विकेट्स घेतल्या. त्याला सामनावीर घोषित करण्यात आले.








पनवेल : दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर पत्रकार संघाच्या वतीने पत्रकार दिनानिमित्त आंतरराष्ट्रीय एक्सलन्स अवॉर्ड पुरस्कार सोहळ्याचे आयोजन आद्यक्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात करण्यात आले होते. या वेळी पत्रकारिता तसेच इतर क्षेत्रांत आपल्या कार्याचा ठसा उमटविणाऱ्या कर्तृत्ववान महिला व पुरुषांचा सन्मान करण्यात आला. या सोहळ्यास जीवन गौरव पुरस्काराचे मानकरी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, खासदार श्रीरंग बारणे आदी मान्यवर उपस्थित होते.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com